# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. १७ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## अत्याचार प्रकरणात सश्रम कारावास

**नवी मुंबई :** पोलीस असल्याचे भासवून तरुणीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार करणाऱ्याला बेलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने १० वर्षांचा सश्रम कारावास, पाच हजारांचा दंड ठोठावला आहे. मुंबई महापालिकेत बोर्ड सिक्युरिटी म्हणून काम करणाऱ्या सागर धुळपने २२ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीला पोलिस असल्याची बतावणी करून पीडित तरुणीसह तिच्या मित्रावर गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवली होती. आरोपीने पीडित तरुणीकडे ३० हजार रुपयांची मागणी केली; मात्र तरुणीकडे पैसे नसल्याचे लक्षात येताच आरोपीने तुर्भे येथे तिच्यावर बळजबरीने लैंगिक अत्याचार केला होता.


विकणे आहे
पोयनाड (ता. अलिबाग)
एस.टी. बस थांब्यापासून
५ मिनीटाच्या अंतरावर
1 BHK Flat 635 Sqft.
Cont. 8425054720


## वे|ध|क

### मुरुडचा पारा घसरला

**मुरुड:** सलग तीन दिवस मुरुड च्या तापमान सातत्याने घट होत आहे. त्यामुळे मुरुडच्या तापमानात कमालीची घट झाली आहे. मुरुडचा पारा १६ खाली घसरल्याने मुरुडकरांसहीत पर्यटकही गारठलेले दिसत आहेत. दिवसा कडक ऊन तर रात्री कमालीची थंडी जाणवू लागली असल्याने महाबळेश्वर सारखा अनुभव येत आहे.दिवाळीच्या सुट्टीनंतर थंडीच्या हंगामामध्ये शालेय सहलींना सुरुवात झाली आहे. जगप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ मोठ्या बसेस संपूर्ण महाराष्ट्रातून दाखल होत आहेत. मुरुड मध्ये अल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याने येणाऱ्या पर्यटकांना आकर्षण निर्माण झाले आहे. मुरुडची थंडी बोचरी असल्याने स्थानिक व पर्यटन ठिकठिकाणी शेकोटी पेटवून आनंद घेत असल्याचे दिसून येत आहेत.


### राहुल आणि सोनिया गांधी यांना दिलासा

**नवी दिल्ली :** नॅशनल हेराल्ड मनी लाँडरिंग प्रकरणात सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना दिल्लीतील राऊस अ‍ॅव्हेन्यू न्यायालयाने दिलासा दिला आहे. न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास स्पष्टपणे नकार दिला. या निर्णयामुळे सोनिया आणि राहुल गांधी यांच्यासह एकूण सात जणांना दिलासा मिळाला आहे. या प्रकरणाच्या पुढील तपासावर आणि न्यायालयीन घडामोडींवर आता सर्वांचे लक्ष लागले आहे. राऊस अ‍ॅव्हेन्यू न्यायालयाने ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला असला तरी, ईडीला या प्रकरणाचा तपास सुरू ठेवण्यास मात्र परवानगी दिली आहे.

### विश्रामगृहाचे काम संथगतीने

**तळा :** तळा नगरपरिषद हद्दीतील तहसील कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील धरणाच्या बाजूला मंजूर झालेल्या शासकीय विश्रामगृहाचे काम संथ गतीने सुरू असून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तळा येथे शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी राज्य सरकारने ३ कोटी १४ लाख ५४ हजारांचा निधी मंजूर केला आहे.बांधकाम पूर्ण करण्याचा कालावधी हा दिड वर्षांचा असून या मंजूर कामाच्या बांधकामास सुरवात होऊन एक वर्ष पूर्ण होत आले असूनही केवळ कॉलम भरण्याचे काम करण्यात आले आहे.सदर काम संथगतीने सुरू असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# रायगडात 45 ब्लॅक स्पॉट




प्रमोद जाधव

**। रायगड ।** डिसेंबरमध्ये नाताळ सण साजरा करण्याबरोबरच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पर्यटकांनी रायगडमध्ये येण्याची तयारी केली आहे. त्यामुळे डिसेंबरचा शेवटचा आठवडा संपूर्ण पर्यटकांनी फुलणार आहे. या कालावधीत रायगडमध्ये दाखल होत असताना वाहन सावकाश चालविण्याचे वाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे. जिल्ह्यातील महामार्गावर ४५ ब्लॅक स्पॉट (अपघात प्रवण क्षेत्र) आहेत. वाहन चालविताना अपघात प्रवण क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्याने अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाहतूक कोंडीदेखील होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहन चालविताना काळजीपूर्वक चालवा, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेकडून करण्यात येत आहे.

### खड्डे दुरुस्तीचा अभाव

मुंबई-गोवा महामार्गासह वेगवेगळ्या मार्गावरील रुंदीकरणाची कामे युध्द पातळीवर सुरू आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील चारपदरीचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे गंभीर अपघात होण्याची भति व्यक्त केली जात आहे.खड्ड्यांची दुरुस्ती तातडीने करून हा प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे.

रायगड जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत आहे. जिल्ह्यात औद्योगिकरणदेखील झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे नागरिकीकरणदेखील वाढू लागले आहे. जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांसह कोकणातील पर्यटनस्थळी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शनिवार व रविवारी तसेच अन्य सुट्टीच्या दिवशी अलिबागसह जिल्ह्यातील वेगवेगळ्या पर्यटनस्थळी पर्यटक फिरण्यास येतात. कोकणातही पर्यटक फिरण्यासाठी जातात. त्यामुळे महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. काही वाहन चालक निश्चितस्थळी लवकर पोहचण्याच्या नादात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करतात. त्यामुळे अपघात होण्याची भीती कायम असते.

> जिल्ह्यातील अपघात रोखण्यासाठी ब्लॅक स्पॉटची माहिती चालकांना दिली जात आहे. अपघात होऊ नये, यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी फलक लावून वाहनांचा वेग कमी करण्याबरोबरच नियमांचे पालन करण्याच्या सूचना केल्या जात आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई केली जात आहे. महामार्गावरून प्रवास करताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. वाहतूक नियमांचे पालन केल्यास वाहतूक कोंडी होणार नाही.
> – अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड

मुंबई-गोवा महामार्गासह, मुंबई-पुणे द्रुतगती, राष्ट्रीय महामार्गावरील काही वळणाच्या ठिकाणी सुसाट वाहने चालविली जातात. वाहतुकीच्या •> पान २ वर

### वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन

**ब्लॅक स्पॉटवर दृष्टीक्षेप**
पोलीस ठाणे - लोकेशन

**राष्ट्रीय महामार्ग ४८**
खोपोली- टाटा पावर हाऊस, अंडा पॉईंट
खालापूर- कलोते, लोधीवली,वावंढळ फाटा

**द्रुतगती महामार्ग**
खोपोली - दहिवली गांव, ढेकू गांव,खोपोली एक्झिट,आडोशी गांव,दस्तुरी
खालापूर - मडप बोगदा ते लोधीवली
रसायनी - रिसवाडी, भातण भोगदा

**राष्ट्रीय महामार्ग - ६६**
दादर सागरी - खारपाडा पूल,खरोशी फाटा
पेण - तरणखोप, रामवाडी, वाशीफाटा
वडखळ - डोलवी
नागोठणे - सुकेळी खिंड, शेतपालस
कोलाड - पुई
माणगांव - कशेणे, ढालघर,तिलोरे,रेपोली
गोरेगाव - लोणेरे , टेमपाले,तळेगांव, लोणेरे बस स्थानक
महाड शहर - टेमपाले , गांधारपाले,वीर
पोलादपूर - चोलई, धामणदेवी, लोहारे,पार्ले
महाड तालुका - दासगांव


**राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ**
कर्जत - कर्जत चारफाटा
खालापूर - शेमदीगांव, कारगांव चावणी

**राष्ट्रीय महामार्ग १६६ डी**
पेण - वाक्रूळ, सावरसई ते सीएनजी

**राष्ट्रीय महामार्ग - ए**
पोयनाड - धरमतर

**राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ**
माणगांव - कोंडेथार कारवा

# पर्यटकांच्या सुरक्षेसाठी समुद्रकिनाऱ्यावर ४२ बीच वॉर्डन



**। रायगड ।प्रतिनिधी ।**
सध्या हिवाळी पर्यटन हंगाम सुरू झाला असून, पर्यटनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या रायगडातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटक मोठ्या संख्येने गर्दी करीत आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रायगड पोलिसांच्या मदतीने आता बीच वॉर्डनची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर तब्बल ४२ बीच वॉर्डन तैनात करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, किहीम, आवास, मांडवा, रेवदंडा, मुरूड, काशीद, दिघी सागरी, श्रीवर्धन, दिवेआगर या समुद्रकिनाऱ्यांवर बीच वॉर्डन नेमण्यात आले आहेत. त्यांना जिल्हा सुरक्षा शाखेमार्फत प्रशिक्षण व ओळखपत्र देण्यात आले आहे. प्रशिक्षित बीच वॉर्डन हे संबंधित पोलीस ठाण्याच्या नियंत्रणात काम करणार असून, ते दोन शिफ्टमध्ये सकाळी ७ ते ११ वाजता आणि सायकांळी ३ ते ७ वाजतामध्ये काम करणार आहेत. समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना कोणतीही अडचण किंवा समस्या उद्भवल्यास तत्काळ मदत करण्यात येणार आहे. बीच वॉर्डन यांनी आपले कर्तव्य बजावत असताना पोलिसांशी समन्वय ठेवावा, •> पान २ वर

> अलिबाग पोलीस ठाणे अंतर्गत अलिबाग ६, वरसोली ५, दिघी सागरी अंतर्गत दिवेआगर (रुपनारायण मंदिर), भट्टी विभाग, दिवेआगर किनारा, एमटीडीसी, सावित्री पाखाडी, हनुमान पाखाडी, गोठणेश्वर मंदिर येथे प्रत्येकी एक, मुरूड पोलीस ठाणे अंतर्गत काशीद किनारा ६, मुरूड किनारा ३, मांडवा पोलीस ठाणे अंतर्गत किहीम ३, मांडवा ३, आवास ३, श्रीवर्धन पोलीस ठाणे अंतर्गत जीवना बंदर १, श्रीवर्धन फेस्टिव्हल किनारा १, श्रीवर्धन मुख्य किनारा २, आरवी किनारा १, हरिहरेश्वर १ असे एकूण ४२ बीच वॉर्डन तैनात केले जाणार आहेत.

# जिल्ह्यात स्क्रब टायफसचा पहिलाच रुग्ण

## चीगर किड्याच्या चाव्यामुळे होणारा आजार

**। महाड । प्रतिनिधी ।**
रायगड जिल्ह्यात स्क्रब टायफस या आजाराचा पहिलाच रुग्ण महाड तालुक्यातील दासगाव येथे आढळून आल्याने जिल्हा आरोग्य प्रशासन सतर्क झाले आहे. चिगर जातीच्या सूक्ष्म किड्याच्या चाव्यामुळे होणारा हा आजार संसर्गजन्य किंवा जीवघेणा नसला, तरी जिल्ह्यात पहिल्यांदाच रुग्ण सापडल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनांना गती देण्यात आली आहे.

दासगाव येथील ७२ वर्षीय महिला गेल्या काही दिवसांपासून ताप, खोकला आणि अंगदुखीने त्रस्त होती. ही महिला सध्या उरण येथे मुलाकडे राहत असून, तेथे तपासणीदरम्यान स्क्रब टायफसचे निदान झाल्याची माहिती समोर आली. त्यानंतर ही बाब दासगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निदर्शनास आणण्यात आली. माहिती मिळताच आरोग्य पथकाने तत्काळ संबंधित महिलेच्या दासगाव येथील घराला भेट देऊन पाहणी केली.

आरोग्य पथकाने घर व परिसराची स्वच्छता करून आजूबाजूला वाढलेले गवत, रोपटी व वनस्पती काढून टाकल्या. तसेच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पावडर फवारणी करण्यात आली, अशी माहिती आरोग्य सहाय्यक तुकाराम कापडे यांनी दिली. •> पान २ वर

## पर्ससीन मासेमारीला दणका

**। पालघर । प्रतिनिधी ।**
पर्ससीन जाळ्याने बेकायदा मासेमारी करणाऱ्या मुंबई, रागयड जिल्ह्यातील सहा ट्रॉलर्सवर मत्स्यव्यवसाय विभागाने शनिवारी कारवाई केली. केळवे समुद्रापासून आठ नॉटिकल मैलावर ही कारवाई करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याच्या १२ नॉटिकल मैलापर्यंत पर्ससीन बोटींना मासेमारीची बंदी आहे. असे असताना ट्रॉलर्स बेकायदेशीर पद्धतीने राज्य हद्दीमध्ये येऊन मासेमारी करत आहेत. अलीकडच्या काळात ट्रॉलर्सच्या येण्याचे प्रमाण वाढले असून, काही महिन्यांत मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आठ ते दहावेळा कारवाया करण्यात आल्या आहेत. असे असताना शनिवारी पुन्हा ट्रॉलर्स आढळून •> पान २ वर

# पिंपरी-चिंचवडमध्ये पवारांची फिल्डिंग

## महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र?

**। पिंपरी । प्रतिनिधी ।**
पुण्यापाठोपाठ पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची शक्यता बळावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी चिंचवडमध्ये स्वबळाचा नारा दिला. त्यानंतर हालचालींना वेग आला आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि अजितदादांची राष्ट्रवादी मतविभाजनाचा फटका बसू नये यासाठी एकत्र येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. यापूर्वी दादांच्या राष्ट्रवादीसोबत न जाण्याचा निर्णय स्थानिक पदाधिकाऱ्यांनी घेतला होता. पण आता राजकीय गणितं आणि समीकरणं बदलली आहे. त्यामुळे भाजपला रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड नंतर पुण्यातही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढल्यास आश्चर्य वाटायला नको.

पिंपरी - चिंचवडमधील अजितदादांच्या राष्ट्रवादीचे निवडणूक प्रमुख नाना काटे आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीचे सदस्य सुनील गव्हाणे या दोघांची नुकतीच बैठक झाली. नाना काटे यांना सुप्रिया सुळे यांचा फोन आला होता. दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. दादांना •> पान २ वर

## रायगड जिल्हा परिषद सीसीटीव्ही निविदा प्रक्रिया

# महाराष्ट्रातील ठेकेदारांना डावलण्याचा प्रयत्न?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
रायगड जिल्हा परिषदेच्या ४०० शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी २ कोटी ४१ लाख २६ हजार रुपये खर्च करण्यात येणार आहे.

यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. निविदा प्रक्रिया राबविताना मराठी ठेकेदारांना डावलण्याचा आरोप होत आहे. महाराष्ट्रातील तीन ठेकेदारांच्या निविदा विविध कारणे दाखवून अपात्र ठरवण्यात आल्या आहेत. तर एका मराठी ठेकेदाराला कागदपत्रे कमी असल्याचे कारण देत पूर्तता करण्यासाठी केवळ २४ तासांचा वेळ देण्यात आला होता. तर यामध्ये गुजरात राज्यातील ठेकेदारांना प्रशासनाने झुकते माप दिल्याची चर्चा जिल्हा परिषदेत सुरु आहे.

> सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.पूर्ततेनुसार कार्यवाही आली आहे. या प्रक्रियेमध्ये ज्यांना तकार असल्यास त्यांनी तक्रार करावी. पडताळणी करून कार्यवाही केली जाईल.
> – **नेहा भोसले,** मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षा हा प्रमुख मुद्दा सध्या राज्यात आहे. ठिकठिकाणी विद्यार्थांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून शाळांमध्ये



सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील सुमारे ४०० शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून सुमारे दोन कोटी ४१ लाख २६ हजार रुपये निधी खर्च करण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत सीसीटीव्ही खरेदीसाठी ई-.निविदा मागविण्यात आली आहे. •> पान २ वर

# अनधिकृत भराव करणाऱ्यांवर कारवाई करा



- **रांजणखार-डावली ग्रामस्थ आक्रमक**
- **प्रांताधिकारी अलिबाग यांना दिले निवेदन**

**। रायगड । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील रांजणखार-डावली गावालगत असणाऱ्या जमिनींमध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता अनधिकृत भरावाची प्रक्रिया सुरु आहे. शासनाच्या प्रकल्पासाठी हा भराव केला जात असल्याचे ठेकेदार निधड्या छातीने सांगत आहे. केला जाणारा भराव न अनधिकृत असून सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करणारा आहे. •> पान २ वर

## येथे मिळते पत्रांपलीकडे सेवा | एका दिवसात ५७ लाख प्रीमियम, १०२४ पॉलिसी

# रायगड डाक विभाग ऑल इंडियात अव्वल!

**। रायगड । प्रतिनिधी ।**
केवळ पत्रव्यवहारापुरता मर्यादित न राहता सामान्य नागरिकांच्या भवितव्याला सुरक्षित करणाऱ्या बचत व विमा योजनांच्या माध्यमातून डाक विभाग सामाजिक बांधिलकी जपत आहे. जंगल, डोंगर आणि समुद्राने वेढलेल्या, सुमारे ९० टक्के ग्रामीण भाग असलेल्या रायगड जिल्ह्यात विमा व बचतीबाबतचा मर्यादित प्रतिसाद बदलत रायगड डाक विभागाने देशपातळीवर इतिहास रचला आहे.

डाक विभागाकडून दरमहा ठराविक दिवशी साजरा होणाऱ्या 'लॉगिन डे' उपक्रमांतर्गत अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प राबवला जातो.''इथे बिझनेस होत नाही'' ही सर्वसाधारण धारणा मोडीत काढत, रायगडचे डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी सेवाभावी दृष्टिकोनातून कामगिरीचा नवा मापदंड उभा केला.आपली कामगिरी आकड्यांसाठी नाही, ती सेवेची आहे. जास्तीत जास्त लोकांचे भले कसे करता येईल, हेच आपले खरे ध्येय असले पाहिजे, या विचारातून त्यांनी कर्मचारी वर्गात विश्वास, अभिमान आणि आत्मविश्वास निर्माण केला. 'टार्गेट' हा केवळ आकडा नसून, कामगिरी अशी असावी की ती पाहून स्वतःलाच अभिमान वाटावा, असा ठाम पण हळुवार संवाद त्यांनी प्रत्येक कर्मचाऱ्याशी साधला. गेल्या वर्षी बचत खात्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद काम गिरी केल्यानंतर, यावर्षी विमा ही काळाची गरज आहे या वास्तवावर लक्ष केंद्रीत करत पोस्टल लाईफ इन्शुरन्स आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनांचा प्रभावी प्रसार करण्यात आला.

**रायगडची ऐतिहासिक एकदिवसीय कामगिरी**

| | |
|---|---|
| प्रीमियम कलेक्शन | 57,42,311 रु. |
| सम अ‍ॅश्युरन्स | 26,51,25,000 रु. |
| पॉलिसी संख्या | 1024 |



> आजपर्यंत एका दिवसात ७.२२ लाख प्रीमियम हा रायगडचा विक्रम होता. तो विक्रम मोडण्याचा विचार करताना रायगड थेट ऑल इंडिया नंबर १ बनला आहे.
> ही माझी वैयक्तिक कामगिरी नाही. रायगड डाक विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्याच्या मनापासून केलेल्या कामाचा हा सामूहिक परिणाम आहे.सामूहिक प्रयत्न झाले,तर अशक्य काहीच नसते. या न भूतो न भविष्यती कामगिरीमुळे रायगड डाक विभागाने सिद्ध केले आहे.
> – सुनील थळकर, डाक अधीक्षक, रायगड

# रेवस-करंजा रो-रो प्रकल्पासाठी नवा प्रस्ताव

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**
रेवस - करंजा रो - रो जेट्टी प्रकल्पासाठी नवीन प्रस्ताव तयार करण्याच्या हालचाली सुरू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पूर्वी खर्च केलेला निधी पाण्यात गेल्याची चर्चा सध्या जोर धरत आहे. या नावीन्यपूर्ण व महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी सागरी मंडळाने ३७.४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. खर्च केलेल्या निधीबाबत मंडळाकडून कानाडोळा होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रेवस येथे रो-रो जेट्टी व तत्सम सुविधा निर्माण करणे हे काम केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेअंतर्गत २०१८-१९ या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आले होते. राज्य सरकारने २३ जानेवारी २०१९ रोजी २५.०७ कोटी रुपयांच्या किंमतीला प्रशासकीय मान्यता दिली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ८ मार्च २०१९ रोजी ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला होता. मात्र, २०२० ते २०२२ या कालावधीत कोरोनाचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे बांधकाम साहित्याचे दळणवळण थांबले. मजुरांचे स्थलांतर झाल्याने कामाला मोठा विलंब झाला. २०२० मध्ये निसर्ग आणि २०२१ मध्ये तौक्ते (२०२१) या चक्रीवादळाच्या नैसर्गिक आपत्तींमुळे प्रकल्प आणखी मागे पडला. ठेकेदाराने काम अतिशय संथ गतीने केले.त्यामुळे त्यांना वारंवार नोटीसा देण्यात आल्या नाहीत. तरीदेखील कामात सुधारणा झाल्या नाहीत.

अखेर १६ फेब्रुवारी २०२४ रोजी ठेकेदाराचा मक्ता रद्द करण्यात आला. आता उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. •> पान २ वर



- **खर्च केलेले १३ कोटी रुपये पाण्यात गेल्याचा आरोप**
- **आता ३७.४ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर**

**पान १ वरून**

## रायगडात ४५ ब्लॅक स्पॉट

नियमांचे उल्लंघन करून वाहने चालविल्याने अपघात होऊन काहींना जीव गमवावा लागतो. तर काहींना जखमी होऊन कायमचे अपंगत्व प्राप्त होते. अपघात रोखण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेमार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जात आहेत. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई केली जाते. ठिकठिकाणी वाहतुकीच्या दहा सुवर्ण नियम फलकांद्वारे चालकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जातो. रायगड जिल्ह्यामध्ये डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लाखो पर्यटक दाखल होणार आहेत. पर्यटकांची अलोट गर्दी जिल्ह्यात होणार आहे. पर्यटकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, म्हणून रायगड पोलिसांकडून वारंवार वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्यास सांगितले जातात. रायगड पोलीस दलाच्या अखत्यारित २८ पोलीस ठाणे आहेत. या पोलीस ठाण्यांपैकी १५ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जिल्ह्यामध्ये ४५ ब्लॅक स्पॉट आहेत. त्यात द्रुतगती महामार्गावर आठ, राष्ट्रीय महामार्ग ६६ वर २५, राष्ट्रीय महामार्ग ४८ वर पाच, राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वर तीन, राष्ट्रीय महामार्ग १६६ ए आणि डी वर तीन, राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफवर एक या अपघात प्रवण क्षेत्राचा समावेश येतो. सर्वात जास्त प्रवणक्षेत्र खोपोली, खालापूर, माणगाव, गोरेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत आहेत. या मार्गांवरून वाहनांची वर्दळ कायमच असते.वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याने ब्लॅक स्पॉटवर मागील वर्षी जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत १४९ अपघात झाले. हे अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या अपघात प्रवण क्षेत्रातील अपघात रोखण्यासाठी वाहन चालकांना वाहन सुरक्षित चालविण्याचे संदेश दिले जात आहेत. वेग मर्यादा फलक लावणे, रब्लींग स्ट्रीप लावणे, दिशा दर्शक बोर्ड, स्पीड ब्रेकर लावणे अशा अनेक प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. चालकांनी आपली सुरक्षितता राखण्यासाठी नियमांचे पालन करून वाहन चालविण्यात यावे, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात वाढत्या औद्योगिकीकरणासह पर्यटनामुळे जिल्ह्यात वेगवेगळ्या भागातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत आहे. रस्ते रुंदीकरणाची कामे जिल्ह्यात होत असली, तरीदेखील वाहनतळ निर्मितीचा प्रश्न कायमच आहे. जिल्ह्यातील महामार्गावर वाहन तळ निर्मितीचा अभाव असल्याने वाहन पार्कींग करताना चालकांना अनेक वेळा समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

## पर्यटकांच्या सुरक्षेसाठी समुद्रकिनाऱ्यावर ४२ बीच वॉर्डन

अशा सूचना त्यांना करण्यात आल्या आहेत. पर्यटकांना भरती-ओहोटीच्या वेळापत्रकबाबत त्यांना सतर्क करणे.समुद्रकिनारी अचानक काही अपघात झाल्यास स्थानिक पोलिस ठाण्यात माहिती देऊन अपघातग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय मदत पुरविणेसाठी प्रयत्न करणे.समुद्रकिनारी चालणारे वॉटर स्पोर्ट्स आणि खाद्यविक्रेते यांच्याकडून पर्यटकांसोबत कोणताही गैरप्रकार होत असल्यास पोलिस प्रशासनास अवगत करणे.पर्यटनाकरिता येणाऱ्या महिला व मुलींची छेडछाड होत असेल, तर दक्ष राहून तत्काळ त्यांना मदत करणे. पर्यटकांच्या हरविलेल्या, सापडलेल्या सामानाची दखल घेऊन सदर ठिकाणी ड्युटी असणाऱ्या पोलिसांना माहिती देणे आदी कर्तव्ये बीच वार्डनला बजवावी लागणार आहेत.

## पर्ससीन मासेमारीला दणका

आल्याने मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्ती पथकाने ही कारवाई केली. मुंबई कुलाबा आणि रायगड येथील खंडोबा, लक्ष्मीनारायण, वैष्णवी, मोरया, हिंगलाई देवी, महालक्ष्मी ट्रॉलर्स मासेमारी करताना आढळून आल्या. त्यांच्याकडे असलेल्या तीन लाख २६ हजारांच्या माशांचा लिलाव करण्यात आला असून, ही रक्कम शासनाने जमा केली आहे.

## जिल्ह्यात स्क्रब टायफसचा पहिलाच रुग्ण

घराशेजारील परिसर व संपूर्ण गावात अशा लक्षणांचे इतर रुग्ण आहेत का, याचीही तपासणी करण्यात आली; मात्र सध्या अन्य कोणताही संशयित रुग्ण आढळून आलेला नाही. सद्यस्थितीत संबंधित महिलेवर पनवेल येथे उपचार सुरू आहेत. योग्य उपचाराची गरज तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत बिरादार यांनी सांगितले की, हा आजार जीवघेणा नसला तरी जिल्ह्यात पहिल्यांदाच रुग्ण आढळल्याने आमची जबाबदारी वाढली आहे. नागरिकांनी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही; मात्र परिसर स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. स्क्रब टायफस हा ओरिएंटिया त्सुसुगामुशी या परजीवीमुळे होतो. माइट्स किंवा चिगर्स नावाच्या सूक्ष्म कीटकांच्या चाव्याद्वारे हा आजार पसरतो. ताप, डोकेदुखी, थंडी वाजणे, अंगदुखी व कधी कधी पुरळ अशी लक्षणे दिसून येतात. रक्ततपासणी किंवा पीसीआर चाचणीद्वारे निदान केले जाते आणि योग्य वेळी अँटीबायोटिक्स उपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होतो, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

## अनधिकृत भराव करणाऱ्यांवर कारवाई करा

शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सुरु केलेला भराव अनधिकृत असून शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा आहे. शेतकऱ्यांचा प्रकल्पाला विरोध नसून शेतकऱ्यांना विश्वासात घ्यावे. काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदाराकडून केला जाणारा भराव थांबवून अनधिकृत भराव करणाऱ्या कंत्राटदारावर कायदेशीर कारवाई करावी, असे निवेदन डावली रांजणखार ग्रामस्थांनी अलिबागचे प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांना सादर केले.रांजणखार- डावली गावालगत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालकीच्या जागेत अनधिकृतपणे भराव सुरु केला आहे. हा भराव ॲफकॉन्स कंपनीने मेसर्स विनायक डेव्हलपर्स या कंपनीला दिला आहे. ज्या कंत्राटदाराला हा भराव करण्याचे काम दिले आहे. भरावाचे काम शासनाकडून घेणारी आणि भराव करण्यासाठी दिलेल्या मेसर्स विनायक डेव्हलपर्स यांनी ग्रामस्थांनी विश्वासात घेतलेलेनाही. मेसर्स विनायक डेव्हलपर्स कंपनीला काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे. शासनाच्या प्रकल्पासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीबाबत आणि त्या जमिनीवर भराव करण्याबाबतची कोणतीही पूर्वसूचना शेतकऱ्यांना देण्यात आलेली नाही. ज्या जागेवर कंत्राटदार कंपनी भराव करीत आहे. त्यापैकी काही जागा सुपीक शेतीची असून काही जगन सीआरझेडच्या क्षेत्रात असल्याची माहिती मिळत आहे. सुपीक जागेवर भराव नेल्याने शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माणहोणार आहे. केल्या जाणाऱ्या भरावामुळे पाण्याचा निचरा होणारे स्रोत बंद होऊन गावात भरतीचे पाणी शिरून आपत्ती ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही असे ग्रामस्थांनी निवेदनात म्हटले आहे.

**रांजणखार - डावली येथे शासनाच्या प्रकल्पासाठीचे काम सुरु आहे. शेतकऱ्यांना सूचना देऊनच प्रकल्प मार्गी लावण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची आणि प्रकल्प उभारणाऱ्या शासकीय संस्थेची बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यात येणार आहेत. यासाठी लवकरच बठकीचे आयोजन केले जाणार आहे, असे अलिबाग प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांनी सांगितले.**

## पिंपरी चिंचवडमध्ये पवारांची फिल्डिंग

देखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढाव्यात असं सांगणारं असल्याचे त्यांनी स्पष्ट केलं होते असा दावा नाना काटे यांनी केला. त्यानुसार ही बैठक झाली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतून इच्छुक असणारे अनेक जण उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेत आहेत. जर स्वतंत्र लढलो तर मतविभाजन होऊन भाजप आणि इतर पक्षांना फायदा होईल. त्यामुळे मत विभाजन टाळण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे घड्याळावर की तुतारीवर लढायचं हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. दोन्ही बाजुचे नेते एकत्र येऊन त्याविषयीचा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास, भाजपविरोधात त्यांचा सामना होईल. मुंबईतही भाजप-शिवसेनेने अजितदादांच्या राष्ट्रवादीला सोबत घेतले नाही. त्यामुळे राज्यात मैत्रिपूर्ण लढत होतील. पण पुणेच्या बालेकिल्ल्यात भाजपविरोधात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील आणि सामना रंगेल. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजितदादांच्या राष्ट्रवादीमध्ये इनकमिंग वाढले आहे.

## रेवस-करंजा रो-रो प्रकल्पासाठी नवा प्रस्ताव

यामुळे प्रकल्पाच्या पूर्णत्वात आणखी विलंब होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी केंद्र हिस्सा १.७४ कोटी आणि राज्य हिस्सा १२.५३ कोटी असा एकूण २२.२७ कोटी रुपये निधी प्राप्त झाला. आतापर्यंत १३.१७ कोटी रुपये खर्च झाले आहेत. मात्र, वाढलेल्या खर्चामुळे सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव ३७.०४ कोटी रुपयांचा २९ एप्रिल २०२४ रोजी शासनाकडे पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण केले जाईल अशी माहिती समोर येत आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाने ठेकेदाराचा मक्ता रद्द केला असून, उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी नवीन निविदा प्रक्रिया राबवण्याची तयारी सुरू आहे. या प्रकल्पावर आतापर्यंत १३.१७ कोटी रुपये खर्च झाले असले तरी, संथ गतीमुळे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे प्रकल्प रखडला आहे. यामुळे खर्च वसूल करण्याबाबतची मागणीची चर्चा जोर धरत आहे. रो-रो जेट्टी पूर्ण झाल्यास वाहतूक सुविधा सुधारेल आणि पर्यटनाला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. मात्र, अपूर्ण प्रकल्पामुळे आर्थिक नुकसान होत असल्याची टीका होत आहे. याप्रकरणी शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यावर उत्तर ही देण्यात आले आहे. शासन स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाला गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे, असे संजय सावंत यांनी सांगितले.

## महाराष्ट्रातील ठेकेदारांना डावलण्याचा प्रयत्न?

मात्र या निविदा प्रक्रियेतून महाराष्ट्रीयन ठेकेदारांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी सात निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत. यामध्ये तीन ठेकेदार गुजरात राज्यातील आहेत. यामुळे ठेका हा गुजरात राज्यातील ठेकेदाराला मिळतोय की महाराष्ट्रीय ठेकेदाराला मिळतोय याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend22 / 25-26 RFX 7000038258 .. 2nd call** | SITC, 22kV feeder for M/s BPCL plant Rasayani POL & BOT plants at 220kV Apta S/Stn under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 37,35,608.22** |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 16.12.2025 to 26.12.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 26.12.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-11 / 25-26 7000037948 .. 3rd call** | Scheme for installation of 100kV Bus sectionalizer bay at 100/22kV Shahapur substation under EHV (O&M) Dn. Dombivali. **Tender Fee - Rs. 500/- +GST** | **Rs.50.73 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 17.12.2025 to 29.12.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 29.12.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer (Adm)
Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सरस्वती राहुल जायभाय यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे पुलाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २४ | २/ब | ४-५१-०० पैकी लिहून देणार यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र १-२०-०० यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे अविभक्त क्षेत्रापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२०-०० | २-१४ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४(चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/१२/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे दहिवली तर्फे निड ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत आमचे आशील सन्ति नाथ मैत्य निलेश सदाशिव पाटील या विद्यमान मालका कडुन हे खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३८ | १/२७ | २७८-७० चौ. मी. | ५-७० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, वारस हक्क, पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
१७/१२/२०२५
मो. नं ९२८४६७७५१६
८३९०७८९५९९

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक नितीनकुमार नरहरी राऊत, रा. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चोंढी ता. अलिबाग | ८२ | ०-१७-१० पो.ख.०-०८-२० ०-२५-३० | ००.२८ |

तसेच सदर मिळकतीमध्ये ग्रुपग्रामपंचायत किहिमकडे असेसमेंट सदरी नोंदविलेले ग्रुपग्रामपंचायत किहिम मिळकत क्रमांक १२४२ ही घर मिळकत.

वर नमुद केलेली मिळकत व घर मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे. तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १० दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १६/१२/२०२५

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मोबा नं. ९८२२०१७१६१

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळिवण्यांत येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर रा. ए/१०३, नवउमिया कृपा हौ. सोसा. राजाजी पथ, माधवी बंगला मागे, म्हात्रे नगर, डोंबिवली पूर्व, कल्याण-ठाणे यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल | २६६२ | | ०-३२-५० | १८.७७ |
| ता.अलिबाग | | पो.ख. | ०-००-६० | |
| | | एकूण | ०-३३-१० | |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर व सही हिश्शेदार श्री. वसंत हरीश्चंद्र पिळणकर यांचे मालकीहक्कात असलेले ०-२७-४० हे. आर., पो.ख. ०-००-६० हे. आर. एकूण क्षेत्र ०-२८-०० हे. आर., आकार रु. १५.८२ पैसे या मिळकतीपैकी श्रीमती अंजली पांडुरंग मांजरेकर यांचे मालकीहक्कात असलेले ०-१०-२० हे. आर. मिळकतीबाबत.

सबब सदरहू बागायत मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू बागायत मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून एकवीस दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ११/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
**दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,**
**ता. अलिबाग, जि. रायगड.**

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक **मानसी मोहन राईलकर,** यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | १३५५/९ | ०-०४-७० पो.ख. ०-००-४० एकूण क्षेत्र ०-०५-१० | २.१५ |

दिनांक : १६/१२/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ,
अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

### वसंत पुष्प ॲनेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

जुन्या नगरपालिकेजवळ, कामतआळी, अलिबाग, जि.रायगड
४०२२०१
नोंदणी क्रमांक : आरजीडी/एबीजी/एचएसजी (टीसी)/२४७१/११दि.२४-११-२०११

दिनांक : १५-१२-२५

**जाहीर नोटीस**

वसंत पुष्प ॲनेक्स सह. गृह संस्था मर्या. अलिबाग या संस्थेच्या ए,बी.व सी. विंग टेरेसवरील पत्राशेड बनविणेकामी अनुभवी ठेकेदारांकडून कोटेशन (निविदा) मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी ८ दिवसांचे आत निविदा वरील नावाने संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत प्रत्यक्ष आणून द्याव्यात. पत्राशेड ही मजुरीवर देण्यात येणार आहे. सदर प्राप्त झालेला निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार कमिटीने राखून ठेवला आहे. सदर निविदा भरणाऱ्या ठेकेदारांनी प्रत्यक्ष सोसायटीत येऊन पाहणी करावी.
संपर्क- मो.नं.९४२२५९४५५२/९८८१५५४५६७

**वसंत पुष्प ॲनेक्स, सह. गृहनिर्माण संस्था मर्या.**

| सही | सही | सही |
|---|---|---|
| **खजिनदार** | **सचिव** | **अध्यक्ष** |

### दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.

जिल्हा मार्केटींग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग

**वाढीव मिलर्स अल्पमुदतीची निविदा**

शासकीय आधारभूत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यांत सन २०२४-२०२५ मध्ये खरेदी केलेल्या भाताची (धानाची) भरडाई करण्यासाठी **जिल्ह्यातील, लगतच्या व इतर जिल्ह्यातील** इच्छुक वाढीव मिलधारकांकडून सीलबंद लिफाफ्यामध्ये ऑफर्स मागविण्यांत येत आहेत. इच्छुक वाढीव मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त FRK मिश्रीत तांदुळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. भरडाई करावयाच्या भाता संबंधिच्या अटी व शर्ती तसेच ऑफर्स फॉर्म संबंधित जिल्हा मार्केटींग अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग तथा सदस्य सचिव जिल्हा भात भरडाई समन्वय समिती यांचेकडे कार्यालयीन वेळेत खालील पत्त्यावर प्राप्त होतील. ऑफर भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालील प्रमाणे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी — दि.१७/१२/२०२५ ते दि.१९/१२/२०२५ कार्यालयीन वेळेत
ब) ऑफर्स भरण्याची अंतिम तारीख — दि.१९-१२-२०२५ दुपारी ५ वाजेपर्यंत
क) ऑफर उघडण्याची तारीख — दि. १९/१२/२०२५

जिल्हा पणन अधिकारी
रायगड-अलिबाग

पत्ता :
जिल्हा पणन अधिकारी कार्यालय
बाफना बाग बी, रो.हौस नंबर १४,
बिग फ्लॅश हॉटेलच्या मागे, रेवस रोड,
ता.अलिबाग, जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र.९१६८०५९९२५,८४०८८६६६१९

### जाहीर नोटीस

**अर्जदाराचे वकील ॲड. संतोष मारुती सापते**
**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :- / २०२५

१) श्री. बशीर युसुफ महाडिक
वय ६६ वर्षे, व्यवसाय:- शेती — अर्जदार
रा. मु. पो. वाळवटी ता. श्रीवर्धन जि. रायगड

**विरुद्ध**

१) मा. ग्रामविकास अधिकारी तथा जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वाळवटी श्रीवर्धन जि. रायगड — सामनेवाला
२) गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीवर्धन ता.श्रीवर्धन जि.रायगड

सर्व जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार

श्री.बशीर युसुफ महाडिक हे मु.पो.वाळवटी ता.श्रीवर्धन जि.रायगड येथील कायमस्वरूपी चे रहिवासी आहेत. अर्जदार यांचा जन्म दिनांक ११-०६-१९५९ रोजी मु. पो. वाळवटी ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांच्या जन्माच्या नोंदीबाबत दाखला मिळण्याकरिता व तशा प्रकारची निर्देश यातील सामनेवाले यांस मा. न्यायालयामार्फत देण्याकरता मा. न्यायालय जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करून मिळण्याकरिता मा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामासाठी व इतर खाजगी कामे करण्याकामी हवा आहे.

सबब या नोटिसेने कळविण्यात येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत व तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३०(तीस) दिवसाच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचा जन्म दिनांक ११-०६-१९५९ रोजी मु.पो. वाळवटी ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा. न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाचीही तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक:- १३/११/२०२५

सही /-
**मा. कार्यकारी दंडाधिकारी श्रीवर्धन**
**ता.श्रीवर्धन जि.रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक सुनिता रोहीदास मोरे, शोभा अशोक जैन, व रसिका उदय मांडे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ४८/३ | ००-४८-०० या एकूण क्षेत्रापैकी वर उल्लेख केलेल्या मालकांच्या मालकीचे ००-२०-०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ०३-४२ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७ डिसेंबर २०२५

**ॲड.शरद आर.सावंत**
बी. कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक सौ. स्वप्ना नितीनकुमार राऊत, रा.चोंढी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चोंढी ता. अलिबाग | ८३ | ०-५८-९० पो.ख.०-१९-८० ०-७८-७० | ४.०४ |

वर नमुद मिळकतीमध्ये सौ. स्वप्ना नरहरी राऊत यांचे मालकीचे असलेले ०-१५-०० हे.आर. इतकी मिळकत

वर नमुद केलेली मिळकत ०-१५-०० हे.आर. क्षेत्राची मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे. तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १० दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १६/१२/२०२५

**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मोबा नं. ९८२२०१७१६१

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**

दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड
पिन : ४१०२०६
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/जन्म/७६३२७७९/२०२५
दि.१५/१२/२०२५

'नोटीस'

विषय:- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.
संदर्भ :- अर्जदार श्री.प्रकाश दिनकर शिंदे, यांचा दि.१८/११/२०२५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. प्रकाश दिनकर शिंदे, मु.सोनगाव सं,निंब,पो.क्षेमाहुली, ता.जि.सातारा यांनी त्यांचा मुलाचा चि.पंकज प्रकाश शिंदे उशिरा जन्माचा नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अर्जदाराच्या मुलाचे नांव
चि.पंकज प्रकाश शिंदे.

सही/-
**अपर तहसीलदार पनवेल करिता**

## निवडक

### शेकापचे रमेश गोरे इच्छुक



**पनवेल :** रमेश गोरे हे पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील असून त्यांची शेतकरी कामगार पक्षावरील निष्ठा पाहून माजी बाळाराम पाटील यांनी त्यांना कामोठे शहर उपाध्यक्षपदावर नियुक्ती केले आहे. तसेच, आदर्श मित्र मंडळाचे ते अध्यक्ष सुद्धा आहेत. सेक्टर १८ मध्ये मुलांना प्रोत्साहित करण्यासाठी ते दरवर्षी मैदानी खेळाचे सामने भरवतात. अपुऱ्या पाणी पुरवठेबाबत त्यांनी सातत्याने आवाज उठवला असून कामोठेमधील रस्ते दुरुस्त व्हावेत, यासाठी देखील त्यांनी पालिकेकडे आवाज उठवला होता. तसेच, सेक्टर २१ मध्ये जलकुंभ व्हावा, यासाठी देखील सिडकोकडे आणि पालिकेकडे मागणी केली होती. त्यामुळे प्रभाग १३ मधील सर्व समस्या त्यांना ज्ञात आहे. त्यामुळे ते प्रभाग १३ मधून अगामी महापालिकेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून ते बहुमताने निवडून येतील, असे मत स्थानिक शेकाप कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे.

### अनिरुद्धची जागतिक विक्रमाला गवसणी





**आगरदांडा :** रांगोळी विश्वात दोन जागतिक विक्रम केल्यानंतर नांदगावच्या अनिरुद्ध खेडेकर या प्रसिद्ध रंगावलीकाराने पुन्हा एकदा तिसऱ्या जागतिक विक्रमाला गवसणी घातली आहे. त्याने डोक्यावर चाळणी घेतलेल्या बालकाची हायपर-रिअलिस्टिक पोर्ट्रेट रांगोळी साकारल्याबद्दल पुन्हा एकदा इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झालेली आहे. तसेच, त्यांच्याद्वारे या कार्यासाठी अनिरुद्ध यांना 'आय.बी.आर. अचिव्हर' ही मानाची पदवी प्रदान करण्यात आली.अनिरुद्ध खेडेकर याने साकारलेल्या 'कवडसा' या रांगोळीत बालकाच्या शरीरावर पडलेल्या प्रकाश व सावलीच्या सूक्ष्म आणि गुंतागुंतीच्या छटा अत्यंत प्रभावीपणे चित्रित केल्या होत्या. छाया प्रकाशाचे अक्षरशः जिवंत वर्णन करणारी ही रांगोळी रेवदंडा येथील श्री कालभैरव जयंतीनिमित्त दि. १२ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत येथील मंदिरात प्रदर्शनासाठी देवण्यात आली होती. याची अधिकृत नोंद २२ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. त्यामुळे अनिरुद्धच्या या तिसऱ्या जागतिक विक्रमाबद्दल नांदगावमधील अनेकांनी त्याचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

### बनावट मद्य वाहतुकीवर कारवाई



**पनवेल :** नाताळ व नवीन वर्षाच्या पार्श्वभुमीवर बनावट मद्य वाहतुकीवर राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभागाने कारवाई करून जवळपास अडीच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी एकाला ताब्यात घेतले आहे.राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभागाने तळोजा येथील प्रभाग १६ मधील शिवम अपार्टमेंट येथे सापळा रचुन एका चारचाकी वाहनाला ताब्यात घेण्यात आले. त्या वाहनाची तपासणी केली असता त्यात बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या १४४ बाटल्या सापडल्या. या बाटल्यांसह चारचाकी वाहन असा एकूण २ लाख ५८ हजार १२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून जयवंत भोईर याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने हे मद्य हे जवळच असलेल्या फ्लॅटमधून आणले असल्याचे सांगितले. त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला असता तेथे बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रँडच्या ८० हजार २७० रुपये किमतीच्या २५० बाटल्या सापडल्या. असा दोन्ही मिळून एकूण ३ लाख ३८ हजार ३९० रुपये इतक्या मिमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



### सुधागडात एकांकिका स्पर्धेची मेजवानी

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यातील पाली येथील प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन गुरूवारी (दि.१८) करण्यात आले आहे. या सांस्कृतिक पर्वाचे विशेष आकर्षण म्हणजे यंदाच्या विजेत्यांना बुधवारी (दि.२४)सुप्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते प्रशांत दामले यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. सध्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, १८ ते २४ डिसेंबर या कालावधीत रायगड जिल्ह्यासह सुधागडवासीयांसाठी एक समृद्ध सांस्कृतिक मेजवानी अनुभवण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात विविध नामवंत कलाकार, मान्यवर पाहुणे, स्पर्धक, परीक्षक आणि रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरही या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून सुधागड तालुक्यातील सांस्कृतिक चळवळीला बळ मिळत असून, ग्रामीण भागातील कलावंतांना प्रोत्साहन देण्याचे कार्य प्रतिष्ठान सातत्याने करत आहे. ही परंपरा यंदाही तितक्याच उत्साहात आणि व्यापक सहभागासह पुढे नेली जाणार आहे.

### अदृष्य गतिरोधक अपघातांना आमंत्रण

**रसायनी :** रसायनी-आपटा रस्त्यावरील गुळसुंदे येथील तुंगारतन विद्यालयासमोरील रस्त्यावरील गतिरोधकांना पांढरे पट्टे नसल्याने अपघातांची मालिका सुरुच आहे. वाहन चालवत असताना हे गतिरोधक दिसत नसल्याने वाहने गतिरोधकावरुन आदळून अपघात होत आहेत. रसायनीहून गुळसुंदेकडे जाताना तसेच आपटाहून रसायनीकडे येताना या रस्त्यावरील गतिरोधक दिसेनासे झाल्याने वाहने आपटल्याने चारचाकी, दुचाकीस्वार जखमी होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या गतिरोधकांना पांढरे पट्टे मारावेत, अशी मागणी होत आहे.

# मानवनिर्मित वणवे निसर्गाच्या मुळावर

## || आग विझवण्यात वन विभाग अपयशी || पशु-पक्ष्यांचा अधिवास धोक्यात

**| खोपोली | प्रतिनिधी |**

**रायगड जिल्ह्यात दरवर्षी रस्ते, वाढते शहरीकरण, औद्योगिक विकास आणि खाणींच्या नावाखाली हजारो वृक्षे तोडली जात आहेत. त्यातच वणव्यांची भर पडून आधीच कमी झालेली जंगले आणखी कमी होत असल्याचे सर्वत्र पाहायला मिळत आहे. या वणव्यात वन्यजीव व पशू-पक्ष्यांचा होरपळून मृत्यू होत आहे. खालापुर तालुक्यातील ग्रामीण भागात देखील बहुतांशी ठिकाणी मानव निर्मित वणवे लावले जात असल्याने ते निसर्ग सौंदर्याच्या मुळावर उठल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. तसेच, हे वणवे रोखण्यासाठी संबंधित प्रशासन व वन विभागाकडून उपाययोजना राबविण्यात येतात. तरीदेखील ते वणवे विझविण्यासाठी अपयशी ठरत असल्याचे स्थानिकांसह निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. त्याचा परिणाम वातावरणात दिसून येत आहे.**



यंदाच्या लांबलेल्या पावसाने जिल्ह्यातील डोंगर हिरवेगार झाले होते. आता हिवाळा सुरू झाला असून दुपारच्या वेळेला उन्हाची तीव्रता देखील हळूहळू वाढू लागली आहे. परिणामी डोंगरावरील हिरवेगार दिसणारे गवत सुकू लागले आहे. या सुकणाऱ्या गवताना अचानक वणवे लागण्याच्या घटना अनेक ठिकाणी घडत आहेत. त्याचा परिणाम निसर्गावर होत आहे. त्यामुळे हिरवेगार दिसणारे डोंगर अचानकपणे काळे दिसू लागले आहेत. त्यामुळे येथील जंगलांवर अबलंबून असणारे पशु-पक्षी व वन्य जीवांचा रहिवास संपुष्टात आला आहे. असेच चित्र खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. त्यामुळे डोंगरासह परिसराची शोभा हरवत चालली आहे.

जंगलात वणवा लागण्याची दोन कारणे आहेत. एकतर झाडांच्या सुकलेल्या फांद्या एकमेकांना घासून त्यातून आगीची ठिणगी निर्माण होऊन वणवा लागतो. तर, दुसरे कारण म्हणजे मानवाने जाणिवपुर्वक लावलेला वणवा. मात्र, आताच्या काळात मानवनिर्मित वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. खालापूर तालुक्यातील शहरीकरण, शिकार इत्यादी कारणांसाठी जंगलासह शेतात व ओसाड माळरानावर वणवे लावण्याच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. या मानवनिर्मित वणव्यामंध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होत असून त्याचबरोबर दुर्मिळ वन्यजीवांच्या जाती देखील नष्ट होऊ लागल्या आहेत. अनेक उपाय करूनही वणवे थांबण्याचे नाव घेत नसल्याने हे वणवे खालापूर तालुक्यात वन विभागाची डोकेदुखी ठरू लागली आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढत असतानाच डोंगरांना व परिसरात अचानक आग लागून वणवे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. वणव्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी वनविभागाकडून दरवर्षी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात; तरीदेखील वणव्यांच्या घटनांचे प्रमाण हवे तसे कमी होताना दिसत नाही. त्यामुळे मानवनिर्मित वणवे हे निसर्ग सौंदर्याच्या मुळावर उठत असून यावर वेळीच उपायोजना न राबवल्यास आगामी काळात उन्हाची तीव्रता अधिक वाढून अनेकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणार, अशी चिंता निसर्गप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

### जैवविविधता धोक्यात

वृक्षराजांनी समृद्ध असलेल्या डोंगर रांगा वणव्यांमुळे उजाड होत आहेत. या वणव्यांत मोठ्या वृक्षांबरोबरीने लहान रोपांचीही हानी होत असल्याने बहुसंख्य शेतकरी वर्ग मोठ्या चिंतेत सापडले आहेत. वन्य प्राण्यांनाही या वणव्यांच्या मोठ्या प्रमाणात झळा बसत असून त्यांचे अधिवास देखील नष्ट होत आहेत. तर, वेळीच वणवे रोखले नाही तर असणारी जैवविविधता धोक्यात येणार यात तिळमात्र शंका नाही.

> **ही भुमाता जिच्या पोटी आपण जन्म घेतला, तिची मनुष्याव्यतिरिक्त अनेक संताने आहेत. की जे आपले बांधव आहेत. म्हणजे वृक्ष, वेली, पशु-पक्षी, सरपटणारे प्राणी, किडे, मुंग्या, असे असंख्य जीव या भुमातेच्या अंगा खांद्यावर खेळत, बागडत असतात. त्याचबरोबर हे असंख्य जीव आपले निसर्गचक्र नीट राखण्याचे काम माणसापेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने करीत असतात. परंतु, अशा प्रकारे वणवे लावून माणुस निसर्गचक्रामध्ये हस्तक्षेप का करीत आहे? डोंगराला वणवे लावून आपण आपल्याच पायावर कुऱ्हाड मारीत आहोत.**
> **- गुरूनाथ साठिलकर, निसर्गपेमी**

# आक्षी समुद्रकिनारी आठ बेंचेसचे लोकार्पण

**| अलिबाग | शहर प्रतिनिधी |**



**■ मालती राऊत यांच्यावर कौतुकाचा वर्षाव**

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील समुद्रकिनारी बसण्यासाठी स्टीलच्या आठ बेंचेसचे आक्षी ग्रामपंचायतीतर्फे सोमवारी (दि.१५) लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अलिबाग तालुक्यातील आक्षी समुद्रकिनाऱ्यावर गेल्या काही वर्षांपासून पर्यटकांची रेलचेल वाढत आहे. त्यामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळत आहे. तसेच, पर्यटन वाढीसाठी या ठिकाणी आक्षी ग्रामपंचायती तर्फे विविध विकास कामे करण्यात आली आहेत. त्यात समुद्रकिनारी विजेच्या दिव्यांची व्यवस्था, निवारा शेड, कचरा कुंड्या आणि बसण्यासाठी बेंचेस इत्यादी व्यवस्था करण्यात आल्या आहेत. मात्र, निवारा शेडमध्ये पर्यटकांसह स्थानिकांना बसण्यासाठी असलेल्या सिमेंटच्या बेंचेसची दयनिय अवस्था झाली होती. त्यामुळे याठिकाणी पर्यटकांसह स्थानिकांची बसण्यासाठी होणारी गैरसोय लक्षात घेता आक्षी गावच्या ज्येष्ठ महिला मालती राऊत यांनी पुढाकार घेत स्टिलचे आठ बेंचेस आक्षी ग्रामपंचायतीला भेट दिले आहेत. त्यांनी त्यांचे पती दशरथ राऊत व मुलगा प्रसाद राऊत यांच्या स्मरणार्थ ही भेट दिल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. त्याच बरोबर सिमेंटचे ४ बेंचेस देखील आक्षी स्मशानभूमीला भेट दिले आहेत.

या बेंचेसचा लोकार्पण सोहळा सोमवारी (दि.१५) मालती राऊत यांच्या हस्ते आक्षी समुद्रकिनारी पार पडला. दरम्यान, त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे. तसेच, गावच्या रहिवाशांनी देखील असाच पुढाकार घेत आक्षी गावच्या पर्यटन वाढीसाठी हातभार लावावा, जेणेकरून स्थानिकांसह येथील व्यावसायिकांना त्याचा फायदा होईल, असेही मालती राऊत यांनी उपस्थितांना आवाहन केले.

यावेळी मालती राऊत यांच्यासह सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्य रश्मी वाळंज, माजी सरपंच नंदकुमार वाळंज, सुनील नाईक, रश्मीन गुरव, श्रेया गुरव, आश्लेषा नाईक, अभिजित वाळंज आदींसह स्थानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चालू ट्रान्सफॉर्मरमधून कॉइलची चोरी

**| खोपोली | प्रतिनिधी |**



खालापुर तालुक्यातील कुंठेबाग येथे विद्युत मंडळाचे ट्रान्सफॉर्मर बसविले असून येथुनच या परिसरात विजेचा पुरवठा होतो. दरम्यान, सोमवारी (दि.१५) रात्रीच्या सुमारास परिसराचा वीजपुरवठा खंडित झाल्याने महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी ट्रान्सफॉर्मरकडे धाव घेतली असता ट्रान्सफॉर्मर गायब झाल्याचे दिसून आले. याची माहिती तात्काळ महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सहाय्यक अभियंता प्रवीण शेटगे यांना माहिती दिली. तर, महावितरणचे कर्मचारी यांनी ट्रान्सफार्मरची तपासणी केली असता ऑईल व तांब्याची कॉईल चोरीला गेल्याचे लक्षात आले. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या ट्रान्सफॉर्मरमधून चक्क १६० लिटर ऑईल व १०० किलो तांबा चोरून नेले आहे. या चोरीत जवळपास ९० हजार रुपयाच्या मालाची चोरी झाली आहे. विशेष म्हणजे चोरट्यांनी चालू ट्रान्सफार्मरमधून चोरी केल्याने सर्वजण अजब झाले आहेत. या घटनेचा पुढील अधिक तपास खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खालापुर पोलीस करत आहेत.

## गोळेवाडी मुख्य रस्त्याची चाळण

**| खोपोली | प्रतिनिधी |**

गेल्या काही वर्षांपासून गोळेवाडी मार्गे खानाव, भोकरपाडा, नारंगी गोरठण अशा अनेक गाव आणि वाड्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची चाळण झाली आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणे सर्वांनाच जिकरीचे बनले आहे. संबंधित प्रशासनाने या रस्त्याची दुरूस्ती करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून व्यक्त होत आहे.

खालापूर तालुक्यातील गोळेवाडी, खानाव मार्गे भोकरपाडा, नारंगी गोरठण अशा अनेक गाव आणि वाड्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या मार्गावरुन अनेक शाळकरी विद्यार्थी, नागरिक व चाकरमानी दररोज प्रवास करीत असतात. परंतु, या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे या रस्त्यांबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या मार्गाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन रस्ता खड्डेमुक्त करा, अशी मागणी जोर धरत आहे.

> **गोळेवाडी मार्गे खानाव, भोकरपाडा, नारंगी, गोरठण अशा अनेक गाव आणि वाड्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची खड्डेमय अवस्था झाल्याने जवळपास चार ते पाच किलोमीटर अंतरापर्यत प्रवास करणे जिकरीचे बनत आहे. त्यामुळे हा खड्डेमय रस्ता अपघाताला आमंत्रण देत आहे. संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य घेत हा मार्ग खड्डेमुक्त बनवावा, जेणेकरून सर्वांचा प्रवास सुखाचा बनेल. - शांताराम पाटील, शेकाप नेते**



# विजय हजारे यांचे उपोषण सुरू

**| नेरळ | प्रतिनिधी |**



कर्जत तालुक्यातील रस्त्यांवर झालेली व सुरु असलेली नियमबाहय सर्व अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी तसेच कोल्हारे ग्रामपंचायतमधील मनमानी कारभारा विरोधात ग्रामपंचायतीचे सदस्य विजय हजारे यांनी मंगळवार दि.१६ डिसेंबरपासून येथील साई मंदिराजवळील कोल्हारे-बोपेले चौक येथे उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला अनेक राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला असून या पूर्वी चार वेळा हजारे यांनी उपोषण केले आहे.

कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील नेरळ संकुल विकास प्राधिकरण क्षेत्रातील कोल्हारे, धामोते परिसरातील शासकिय जमिनीवर सर्व अतिक्रमण, अनाधिकृत बांधकामे काढून टाकणे आदी विषयांवर नेरळ कळंब रस्त्यावरील साई मंदिर चौक येथे उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला अनेक राजकिय पक्षांनी पाठिंबा दिला आहे. विजय हजारे यांनी आपल्या उपोषणात विविध १२ विषयांवर विविध शासकीय विभागातीप अधिकारी वर्ग यांच्याकडून न्यायाची मागणी केली आहे. त्यात नेरळ ग्रामपंचायत हद्दीत बांधण्यात आलेल्या राजिप वाणिज्य संकुल व विश्रामगृह इमारत खुली करण्यात यावी व इमारतीत बांधलेले गाळे वाटप करण्यात यावेत. अनाधिकृत इमारतीमध्ये सुरु असलेल्या शाळेची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. डिस्कव्हर रिसॉर्टची थकित घरपट्टी वसुल करावी. ग्रामपंचायत कार्यालयाच्या दुरुस्तीच्या कामाची मुदत संपून गेली तरी काम पूर्ण झालेले नाही. त्या ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करावी. धामोते येथील भाड्याच्या गाळ्यात सुरु असलेले ग्रामपंचायत कार्यालय कोल्हारे येथील मुख्य कार्यालयात सुरु करावे. नेरळ संकुल विकास प्राधिकरण क्षेत्रातील मौजे धामोते हद्दीतील साईबाबा मंदिर ते द मॉर्निंग बिल्डिंग ते ब्रिजपर्यंत डीपी रस्त्याची मोजणी करून पेशवाई मार्गावर डीपी रस्त्यावर झालेली सर्व अतिक्रमणे, अनाधिकृत बांधकामे काढून टाकावी. या प्रमुख मागण्यांसह अनेक महत्वाच्या मागण्यांसाठी हे उपोषण सुरू करण्यात आले आहे.

## सुशोभीकरणाचे भूमिपूजन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

दिघोडे येथील तलावाच्या सुशोभीकरणाच्या नियोजित कामाचे भूमिपूजन मंगळवारी (दि.१६) पार पडले. चिरनेरचे उद्योगपती पी.पी. खारपाटील यांच्या हस्ते तलावाच्या बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले. या तलावाच्या सुशुभिकरणाचे काम पी.पी. खारपाटील कंट्रक्शन अँड कंपनीच्यावतीने करण्यात येणार आहे, अशी माहिती सरपंच कीर्तीनिधी ठाकूर यांनी दिली. यावेळी पी.पी. खारपाटील कंट्रक्शन कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक राजेंद्र खारपाटील, सरपंच कीर्तीनिधी ठाकूर, उपसरपंच कैलास म्हात्रे, माजी सरपंच अविनाश पाटील, पांडुरंग कोळी, अभिजीत पाटील, ग्रामपंचायतीचे सदस्य संदेश पाटील, अलंकार कोळी, उज्वला म्हात्रे, आदींसह वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी व ग्रामस्थ उपस्थित होते.

**पुलाच्या नावाखाली द्रोणागिरीला सुरुंग | हजारो वृक्षांची कत्तल, दुर्मीळ औषधी वनस्पती धोक्यात**

# 'संजिवनी'च्या भूमीवर उत्खननाचा कहर

**| उरण | प्रतिनिधी |**



करंजा-रेवस पुलाच्या बांधकामासाठी ऐतिहासिक, पौराणिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील असलेल्या द्रोणागिरी पर्वताच्या पायथ्याशी सध्या जोरदार उत्खनन सुरू आहे. या कामामुळे केवळ आदिवासींचे अस्तित्वच नव्हे, तर संपूर्ण निसर्गसंपदेवर घाला घातला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. या उत्खननातून द्रोणागिरी परिसरातील हजारो वृक्षांची कत्तल होण्याचा धोका निर्माण झाला असून शेकडो वर्षांची हरित संपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

उरण तालुक्यातील द्रोणागिरी पर्वत हा केवळ डोंगर नसून तो रामायणकाळाशी जोडलेला पवित्र परिसर आहे. रामायणात उल्लेख असलेली संजिवनी बुटी याच द्रोणागिरी पर्वतावर असल्याचा उल्लेख पुराणात आहे. लक्ष्मणाच्या प्राणरक्षणासाठी हनुमानाने संपूर्ण पर्वत उचलून नेल्याची कथा आजही भारतीय संस्कृतीत जिवंत आहे. अशा पवित्र भूमीवर आज विकासाच्या नावाखाली बुलडोझर फिरवले जात आहे. तसेच, या मार्गावर करंजा आदिवासी वाडी आहे. ही आदिवासी वाडी सुमारे १५० वर्षांपासून या ठिकाणी राहत आहे. या उत्खननामुळे द्रोणागीरी डोंगर कमकुवत होत चालला असून आदिवासी वाडीतील लोकांच्या घरांना तडे जाण्याची भिती वर्तविली जात आहे. त्यामुळे त्यांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची भीती देखील वर्तविली जात आहे. त्याचबरोबर या पर्वतरांगांमध्ये अनेक दुर्मीळ औषधी वनस्पती आणि जैविकदृष्ट्या महत्त्वाच्या प्रजाती आढळतात. मात्र, कोणताही सखोल पर्यावरणीय अभ्यास, जैवविविधता अहवाल किंवा स्थानिक ग्रामसभेची परवानगी न घेता उत्खनन सुरू करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमी, आदिवासी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. त्यामुळे पर्यावरण कायदे, वनसंवर्धन कायदे आणि आदिवासी हक्क कायद्यांची पायमल्ली होत असल्याचा थेट आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. यावेळी, ग्रामस्थ आणि आदिवासी संघटनांनी, द्रोणागिरी परिसरातील उत्खनन तात्काळ थांबवावे. हजारो वृक्षांच्या संभाव्य कत्तलीला आळा घालावा. दुर्मीळ औषधी वनस्पतींचे संरक्षण करावे आणि आदिवासींच्या पुनर्वसनाबाबत स्पष्ट लेखी धोरण जाहीर करावे. अन्यथा जनआंदोलन छेडू, असा स्पष्ट इशारा संबंधित प्रशासनाला देण्यात आला आहे.

### आदीवासी समाज भीतीच्या सावटाखाली

या उत्खननाच्या मार्गावर करंजा आदिवासी वाडी असून सुमारे १५० वर्षे हा समाज येथे वास्तव्यास आहे. उत्खननामुळे डोंगर उतार कमकुवत होत असून आदिवासींच्या घरांना तडे जाण्याचा, भूस्खलन होण्याचा आणि त्यातून थेट जीवितहानी होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिक सतत भीतीच्या सावटाखाली जगत आहेत. त्यामुळे त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता, विश्वासात न घेता हे उत्खनन सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात या आदिवासींवर विस्थापित होण्याची वेळ येणार असल्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, हा विकास आमच्या प्राणांवर बेतणार का, असा थेट सवाल आदिवासी करत आहेत.

# निवडणूक क्रमांक दोन

नगरपालिकांच्या निवडणुकांचा निकाल येत्या २१ तारखेला लागेल. त्यांचे विश्लेषण चालू व्हायच्या आता सर्वांचे लक्ष असलेल्या महापालिका निवडणुकांची तयारी सुरु झाली आहे. ही निवडणूक क्रमांक दोन राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी होणार असली तरी राज्याचेच नव्हे तर देशाचे लक्ष मुंबई महानगरपालिकेकडे असेल. प्रदीर्घ काळ राज्यात सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसला निर्णायकपणे मुंबई पालिकेची सत्ता जिंकता आली नव्हती. १९८५ ते २०१५ या तीस वर्षांमध्ये, मधल्या चारेक वर्षांचा अपवाद वगळता ठाकरे यांची सेनाच सत्तेत होती. २०१७ मध्ये भाजपवाले शिवसेनेच्या अगदी जवळ पोचले, पण तरीही सत्ता दूरच राहिली. आता काय वाटेल ते करून मुंबई ताब्यात घेण्यासाठी भाजपने कंबर कसलेली आहे. ईशान्येकडच्या अरुणाचल, मणिपूर इत्यादी राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असणाऱ्या आणि देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबईवर आपले वर्चस्व हवे हे भाजपच्या डोक्यात पक्के आहे. त्यातच संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी मुंबई सोडून द्यावी लागल्याची सल गुजरात्यांच्या मनात आहे. या प्रांताचे दोन पनेतेच सध्या देशाच्या सर्वोच्च पदांवर आहेत. त्यामुळे मुंबई महाराष्ट्रात असली तरी तिच्यावर आमचा ताबा आहे हे दाखवण्याची संधी म्हणून गुजरात्यांच्या प्रभावाखालील भाजप या निवडणुकीकडे पाहत आहे. मराठी मतांची आपल्याला जवळपास काहीच गरज नाही असा भाजपचा आविर्भाव आहे. उध्दव व राज ठाकरे एकत्र आले तरी आपल्याला फरक पडत नाही हे भाजपने वारंवार दाखवले आहे.अमित साटम यांची मुंबई प्रदेशप्रमुखपदी नियुक्ती केली असली तरी भाजपची सर्व मदार गुजराती, हिंदी व मराठी सोडून इतर सर्व भाषकांच्या एकगठ्टा मतदानावर आहे. तिच्यात ते यशस्वी होतील असेच आताचे तरी चित्र आहे. ठाकरे बंधू आणि काँग्रेस हे आव्हान कसे समजून घेतात यावर बरेच काही अवलंबून आहे. तूर्तास तरी या दोन्ही पक्षांचे व त्यांच्या नेत्यांचे अहंकार इतके मोठे आहेत की, त्यांना आपण स्वबळावर लढणे महत्वाचे वाटते आहे. याचा भाजपला फायदा होणार व आपण खड्ड्यात पड़णार हे दिसत असूनही ते शहाणपणा शिकण्यास तयार नाहीत.

## मुंबईची अवघड लढाई

तीन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडली तेव्हा मराठी मतदार अत्यंत संतप्त होता. भाजपचा सफाया होऊ शकेल असे वातावरण होते. पण विधानसभा निवडणुकांनी चित्र बदलले आहे. शिंदे सेना व भाजपने ठाकरे सेनेत अधिकाधिक फुटी घडवून आणल्या आहेत. शिवाय, सत्ता असेल तरच तुमची कामे होऊ शकतील हे लोकांच्या मनावर बिंबवण्यात यश मिळवले आहे. काल दहिसरमधील तेजस्वी घोसाळकर यांनी भाजपमध्ये प्रवेश करणे हे त्याचेच द्योतक आहे. मधल्या काळात भाजप आणि शिंदे सेना यांच्यात खडाजंगी चालू झाली होती. पण अमित शाह यांच्या हस्तक्षेपामुळे ती तूर्तास थांबेल असे दिसते. एकनाथ शिंदे यांचा सर्वाधिक रस ठाण्यात आहे. तिथे त्यांना अधिक वाव देऊन मुंबई, कल्याण व बाकीच्या महापालिकांमध्ये भाजपला वरचष्मा ठेवायचा असे धोरण भाजप नेत्यांनी स्वीकारलेले दिसते. ठाण्यात व मुंबईत जागावाटप करताना भाजप व शिंदेसेनेची कसोटी लागेल. पण ते हुशार आहेत. मैत्रीपूर्ण लढती झाल्या तरी वातावरण हाताबाहेर जाऊ द्यायचे नाही हे त्यांना नगरपालिका निवडणुकीत समजले आहे. याउलट महाविकास आघाडी विखुरली गेली आहे. ठाकरे सेनेचे सर्व लक्ष मुंबईवर राहणार आहे. ठाणे, संभाजीनगर इत्यादी शहरे सेनेसाठी पूर्वापार बरीच मोक्याची. पण मुंबईपायी ठाकरे सेना त्यांच्यावरही पाणी सोडायला तयार होईल असे दिसते. खुद्द मुंबईत राज यांच्या मनसेसोबत गेल्या काही दिवसांपासून वाटाघाटी चालू असल्या तरी प्रत्यक्ष जागावाटप व प्रचार खूप सफाईदारपणे व वेगाने करावा लागेल. मराठी सोडून इतर भाषिक मतदार सेनेला मतदान जवळपास करणार नाही असेच चित्र आहे. त्यामुळे ही निवडणूक त्यांच्यासाठी अत्यंत कठीण ठरणार आहे. त्यातच काँग्रेसशी न जुळल्यास, दलित व मुस्लिम मतेही सेनेपासून दुरावण्याची शक्यता आहे. दुसरीकडे काँग्रेसला हिंदी व इतर भाषकांमधले आपले पूर्वीचे स्थान मिळवणे सोपे नाही. धारावी, मालाड, दक्षिण मुंबई असे काही काँग्रेसचे प्रबळ विभाग आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तर काही स्थानच नाही.

## अन्यत्र युतीमध्ये फूट

अर्थात, महायुतीतही सर्व काही आलबेल आहे असे नव्हे. शिंदे व भाजप यांच्यातला झगडा तूर्त शमल्यासारखा दिसला असला तरी ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, पालघर इत्यादी ठिकाणी एकदुसऱ्यांची मते परस्परांकडे वळणार का हा कळीचा प्रश्न आहे. एकमेकांचे उमेदवार फोडायचे नाहीत असा करार शिंदे व फडणवीसांमध्ये झाला आहे. पण याचा दुसरा अर्थ असा की, उमेदवार सोडून बाकीचे नेते व कार्यकर्ते फोडण्यावर अजूनही बंदी नाही. रवींद्र चव्हाणांचा एकूण आक्रमक पवित्रा पाहता ते शिंदे गटातून माणसे फोडणे चालूच ठेवतील असे स्पष्ट दिसते. कोणतीही निवडणूक भाजपवाले युध्दासारखी लढतात व नीतीमत्ता तर त्यांनी त्यांनी कधीच विकून खाल्ली आहे. त्यामुळे वरवर युती दिसत असली तरी आतून शिंदे यांना डॅमेज करून आपले जास्त उमेदवार निवडून आणण्याचा प्रयत्न होईल. तिकडे पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये तर अधिकृतरीत्या युती तुटली आहे. भाजप व अजितदादांची राष्ट्रवादी हे एकमेकांविरोधात लढतील हे काल मुख्यमंत्र्यांनी पुण्यात जाहीर केले. पुण्यात गेल्या वेळी भाजपने १६५ पैकी ९९ जागा जिंकून बाजी मारली होती. राष्ट्रवादीकडे ४२ जागा होत्या. आता अजितदादा व शरद पवार गट एकत्र येण्याच्या चर्चा आहेत. काँग्रेससह हे सर्व एकत्र लढले तर भाजपला चांगली टक्कर देता येईल. पण शेवटी यावर अजितदादांचाच वरचष्मा राहील व दादा युतीचे असल्याने हा युतीचा विजयच मानला जाईल. एकूण मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे किंवा संभाजीनगर, कोठेही महाविकास आघाडीसाठी एकत्र येण्याचा निर्णय घेणे व तो अमलात आणणे सोपे नाही. इतर शहरातील महापालिकांवर बहुतेक ठिकाणी भाजपचीच सत्ता आहे. वसईमध्ये हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीचा वरचष्मा होता. पण आता आघाडीच्या नेत्यांना रवींद्र चव्हाणांनी पळवले आहे. त्यामुळेच खुद्द हितेंद्र ठाकूरही विधानसभेला हरले होते. नागपूर व चंद्रपूर येथील आरक्षण ५० टक्क्यांहून अधिक असूनही तेथे निवडणुका होणार आहेत. त्यांचे निकाल जर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहणार असतील तर या निवडणुका टाळायला हव्या होत्या. मुंबईच्या आजूबाजूच्या पनवेल, उल्हासनगरकिंवा मीरा भाईंदर तसेच मराठवाड्यातील काही विभाग इथे आपला प्रभाव वाढवण्याचा शिंदे सेनेचा प्रयत्न आहे. पण या निवडणुकांच्या निमित्ताने बहुदा त्या पक्षाला भाजपवाले आपली जागा दाखवून देतील. साडेतीन कोटी मतदार म्हणजे राज्याचा जवळपास ४० टक्के भाग या निमित्ताने मतदान करेल. गेल्या विधानसभेला असलेला कल बदलला आहे का तसाच आहे हे यावेळी दिसेल.

विचार

# 'एसआयआर'ची दहशत

*निवडणूक आयोगाला महसूल आणि शिक्षण विभागाकडून मदत घेऊन मतदार नोंदणी, दुरुस्ती, पुनरीक्षण, मतदान आदी कामे करावी लागतात; ही कामे नियोजित वेळेत आणि पध्दतीने होते का, हे पाहिले जात नाही. त्यातच कामाचा ताण सहन न झाल्याने ब्लॉक लेव्हल दर्जाचे कर्मचारी आत्महत्या किंवा हृदयविकारासारख्या आपत्तीला सामोरे जातात. लोकशाहीत पारदर्शकता आणण्याचे काम करणाऱ्यांनाच अपारदर्शकतेचे बळी व्हावे लागते.*




अजय तिवारी

'बीएलओ' (बूथ लेव्हल ऑफिसर) चे मृत्यू आणि आत्महत्यांनी आगीत तेल ओतले आहे. विरोधी पक्षांनी या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून निवडणूक आयोग तसेच केंद्रातील सत्ताधारी भाजपला लक्ष्य केले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासह अनेक विरोधी नेत्यांनी या मुद्द्यावर निवडणूक आयोगावर टीका केली आहे. अशक्य मतदार पडताळणी लक्ष्ये पूर्ण करण्यासाठी आयोगाने 'बीएलओं'वर जास्त दबाव आणल्याचा त्यांचा आरोप आहे. राजकीय पक्षांच्या दबावामुळे 'बीएलओं'वर दररोज किमान मतदार पडताळणी पूर्ण करण्याचा दबाव वाढला आहे. या 'अमानवी' कामामुळे 'एसआयआर' प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली. अर्थात 'एसआयआर' प्रक्रिया थांबवणे हा त्यावरचा उपाय नाही. जादा पैसे, जादा मानधनासाठी कुणी निवडणूक आयोगाचे काम करत असल्यास त्यांनी हा भ्रम प्रथम दूर केला पाहिजे. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये आतापर्यंत २५ 'बीएलओं'चा बळी गेला आहे. दोन राज्ये भाजपशासित आणि एक राज्य तृणमूल काँग्रेसचे असले, तरी 'बीएलओं'मध्ये सारखाच रोष आहे. निवडणूक आयोग सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या हातचे बाहुले बनला आहे. निवडणूक आयोगावरची टीका भाजपला का झोंबते, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. 'बीएलओ'चे मृत्यू अधिक चिंताजनक आहेत. कारण पुढील वर्षी देशभर जनगणना सुरू होणार असून या महत्त्वाच्या कामाचा भार पुन्हा एकदा शिक्षकांवर पडणार आहे. वस्तुत: 'बीएलओ' घरोघरी जाऊन कागदपत्रे गोळा करत आहेत आणि मतदार यादी अद्ययावत आहे का, याची खात्री करत आहेत. त्यांना लोकशाहीचे खरे सैनिक म्हणता येईल.

ममता बॅनर्जी यांच्या सरकारने बंगालमध्ये 'एसआयआर'दरम्यान मोठे प्रशासकीय फेरबदल केले आहेत. दहा जिल्ह्यांचे पोलिस अधीक्षक बदलले आहेत. अनेकांनी अनेक निवडणुका पाहिल्या आहेत आणि कोणत्याही प्रश्नाशिवाय सरकारी आदेशांचे पालन केले आहे; परंतु या वेळी जमिनीवरील गैरव्यवस्थापन इतके आहे, की ही मंडळीही त्रस्त आहेत. एकीकडे, 'एसआयआर' प्रक्रियेला अनेक आव्हानांचा साम ना करावा लागत आहे, तर दुसरीकडे, अधिकारी त्यांच्यावर 'एसआयआर' प्रक्रिया वेळेवर पूर्ण करण्यासाठी दबाव आणत आहेत. निर्धारित लक्ष्य पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यास 'बीएलओं'वर फिर्याद दाखल करण्याची धमकी देण्यात येते. उत्तर प्रदेशमधील एक प्रकरण तर फारच गंभीर आहे. एका 'बीएलओ'चे लग्न होते. त्याने लग्नाच्या अगोदरच्या दिवसापर्यंत काम करून लग्नासाठी सुट्टी मागितली, तर वरिष्ठ अधिकाऱ्याने त्याला निलंबित केले. लग्न एक दिवसावर आले असताना निलंबित केल्याने 'बीएलओ'ने आत्महत्या केली. एखादी व्यक्ती आवश्यक कागदपत्रे गोळा करू शकत नसली, तरी 'बीएलओ'ला दोष दिला जातो. कोणी आपल्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट करू इच्छित नसले, तरी 'बीएलओ'ला प्रश्न विचारले जातात. या दुर्दैवी कथा कोणत्याही एका राज्यापुरत्या मर्यादित नाहीत. राज्ये बदलत आहेत; पण या 'बीएलओं'ना भेडसावणाऱ्या समस्या सारख्याच आहेत.

मध्य प्रदेशमध्ये दोन 'बीएलओ' हृदयविकाराने मरण पावले. पश्चिम बंगालमध्ये एका महिला 'बीएलओ'ने आत्महत्या केली. पश्चिम बंगालमधील नादिया येथेही एका 'बीएलओ'चा मृतदेह घराच्या छताला लटकलेल्या अवस्थेत आढळला. जयपूरमध्ये एका 'बीएलओ'ने ट्रेनसमोर उडी मारून आपला जीव गम ावला. गुजरातमध्येही चार बीएलओंचे निधन झाले आहे. या मृत्यूंबद्दल सरकारकडे कोणतेही स्पष्टीकरण नाही. त्यांचा मृत्यू दीर्घकालीन आजारामुळे झाला, असे म्हणणे सोपे आहे; परंतु या 'बीएलओं'ची कुटुंबे 'एसआयआर'च्या तणावाने आणि अधिकाऱ्यांच्या धमक्यांमुळे ग्रस्त होते, असे कुटुंबीय सांगतात. या वादाबद्दल एक महिला 'बीएलओ' सांगते, मी वैयक्तिकरित्या 'एसआयआर' प्रक्रियेत सहभागी झाली आहे आणि अनेक लोकांच्या घरी भेट दिली आहे. मला अनेक अडचणी येत आहेत. मी भेट देत असलेल्या भागामध्ये अनेक लोकांनी फॉर्मही भरलेले नाहीत आणि आपली कोणतीही माहिती शेअर करू इच्छित नाहीत. सरकार हे सर्व का करत आहे हे मला त्यांना समजावून सांगावे लागते. शिवाय आपण हा सर्व डेटा ऑनलाइन ॲपमध्ये प्रविष्ट करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ते काम करत नाही. आता ॲप काम करत नसेल, तर ती आमची चूक नाही; परंतु आमच्या कामापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या कामासाठी एक अंतिम मुदत देण्यात आली असून हे काम कोणत्याही किंमतीत पूर्ण केले पाहिजे, असा अधिकाऱ्यांचा आग्रह आहे.

अधिकाऱ्यांच्या या वृत्तीमुळे नाराज झालेले आणखी एक 'बीएलओ' म्हणतात, आम्ही सध्या संकलन प्रक्रियेवर काम करत आहोत, गावोगावी जाऊन डेटा गोळा करत आहोत; पण लोक अजिबात सहकार्य करत नाहीत. या 'एसआयआर'बद्दल इतका गोंधळ आहे की तो समजणे कठीण आहे; पण तरीही आम्ही आमचे शंभर टक्के योगदान देत आहोत. मतदार यादीत विवाहित महिलांचा समावेश करणे हे एक वेगळे आव्हान ठरत आहे. एका घरातून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झालेल्या महिलांचा डेटा समाविष्ट करण्याकामी एक समस्या आहे. 'एसआयआर' प्रक्रियेदरम्यान लग्न करून दुसऱ्या नगर पंचायतीत स्थलांतरित झालेल्या महिलांचे कॉलम भरले जात नाहीत. काही प्रमाणात शिक्षित महिला ऑनलाइन नोंदणी करतात; परंतु सर्वांना हे माहीत नसते. 'एसआयआर'बद्दल जागरूकतेच्या अभावामुळे 'बीएलओ' चिंतित आहेत; परंतु मतदार मदतीसाठी पुढे येत नाहीत याची त्यांना अधिक चिंता आहे. हिंदू मतदार 'एसआयआर' प्रक्रियेचे पालन करत नाहीत. त्यांना त्यांच्या मतदानाची जाणीव नाही. दुसरीकडे, मुस्लिम मतदार पुढे येत आहेत आणि स्वत:साठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी फॉर्म भरत आहेत, हा 'बीएलओं' चा अनुभव विचारात घेण्यासारखा आहे. येथील समस्या मतदार पातळीवर आहेत; परंतु तरीही 'बीएलओं'ना प्रश्न विचारले जात आहेत. 'बीएलओ' संथ गतीने काम करतात, असा आक्षेप घेऊन उपजिल्हाधिकारी दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देतात. केवळ अंतिम मुदत दिली जात नाही, तर अपशब्ददेखील वापरले जात आहेत, असे बहुतांश 'बीएलओं' सांगतात.

एका महिला 'बीएलओं' चा अनुभव थोडा वेगळा आहे. कोणत्याही अधिकाऱ्याने तिच्याशी गैरवर्तन केलेले नाही आणि तिला कोणत्याही धम क्या मिळालेल्या नाहीत; परंतु मतदार हलगर्जीपणा करत आहेत. ते 'एसआयआर' प्रक्रियेचे महत्त्व समजून घेत नाहीत. या महिला बीएलओला मतदारांच्या घरी वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. काम पुढे ढकलले जात आहे. कमी वेळेत ठराविक फॉर्म भरण्याचा अतिरिक्त दबाव आहे; परंतु एखाद्याच्या जीवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही, असे त्या सांगतात. या महिला बीएलओने सरकारच्या ॲपवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. सर्व्हर डाऊन आहे आणि ॲप काम करत नाही असा संताप व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीमध्ये फॉर्म कसे भरता येतील, असा तिचा सवाल आहे. बीएलओ 'एसआयआर'च्या विरोधात नाहीत; आपले कर्तव्य बजावू इच्छितात. त्यांना फक्त प्रशासनाकडून काही पाठिंबा आणि आदर हवा आहे. धमक्या मिळू नयेत, आपल्या वेदना आणि समस्या समजून घ्याव्यात, एवढीच त्यांची अपेक्षा आहे. निवडणूक आयोग हे समजून घेणार का, हा खरा प्रश्न आहे.

# आंबा मोहोरावर वातावरणाचा परिणाम

वैभव पाटील

आजही केव्हा आकाश भरून येईल आणि पाऊस कोसळेल ही टांगती तलवार शेतकऱ्याच्या डोक्यावर कायम आहे. साहजिकच याचा परिणाम आंबा बागायतीवर होत आहे. नोव्हेंबरमध्ये येणारी थंडी उशिरा सुरू झाली. काही भागामध्ये आंबा बागायतीत आंब्यांना मोहोर येतोय असे वाटत होते त्या भागातील आंबा बागायतीत आलेला थोडाफार मोहोरही पावसाने कुजला आहे. सततच्या हवामान बदलामुळे आंबे मोहोरावर परिणाम होत आहे. याचा आंबा पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होणार आहे. त्यामुळे महागडी कीटकनाशके, बुरशी प्रतिबंध औषधे, खते, फवारणी व मजुरीवर केलेल्या खर्चाच्या तुलनेत मुद्दलही हाती लागेल की नाही, अशी भीती आंबा बागायतदारांना वाटत आहे. यंदा डिसेंबर महिन्यात विशेषत: ढगाळ हवामान व धुके पडल्याने आंब्याचा मोहोर जळून गेला. गेल्यावर्षी कडाक्याची थंडी असल्याने आंब्याला चांगला मोहोर आलेला दिसत होता; मात्र यंदा थंडीही उशिरा सुरू झाली. त्यात सतत ढगाळ हवामान राहिले. यामुळे आंब्याचा मोहोर फुटायला उशीर झाला होता. ढगाळ हवामानामुळे आंब्याच्या झाडांवर भुरी रोग आणि तुडतुडी यांचे प्रमाण वाढले आहे. यंदा दररोज होणाऱ्या हवामानातील बदलांमुळे आंब्याच्या पिकावर परिणाम होत आहे. हापूस आंबा बागायतदारांसाठी हंगामी उत्पन्नाचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे डिसेंबर-जानेवारी महिन्यात येणारा मोहोर होय. या काळात सलग कमी तापमान राहिल्यास मोहोर योग्य प्रमाणात येतो व टिकून राहतो. याच पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली थंडी अचानक ओसरल्याने आंबा बागायतदारांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. वातावरणातील तापमान वाढल्याने मोहोरावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मागील पाच-सहा दिवसांपासून सकाळ-संध्याकाळची थंडी पूर्णपणे गायब झाली आहे. दिवसाचे कमाल आणि किमान तापमान दोन्ही वाढल्यामुळे मोहोर कुजण्याची, किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची तसेच मोहोर पूर्णपणे गळून पडण्याची भीती बागायतदार व्यक्त करीत आहेत. काही बागायतदारांनी मोहोर लवकर यावा म्हणून कल्टार वापरले होते. यामुळे त्यांच्या बागांत काही प्रमाणात मोहोर दिसू लागला आहे. परंतु ज्यांनी नैसर्गिकरीत्या मोहोर फुटण्याची वाट बघितली, त्यांच्यासाठी थंडीचा ओसरलेला परिणाम अधिक धोकादायक ठरू शकतो. नैसर्गिक मोहोर फुटणे थंडीवर अवलंबून असल्याने आता तो लांबणीवर जाण्याची किंवा कमी प्रमाणात येण्याची शक्यता वाढली आहे. निसर्गाच्या लहरीपणाने नैसर्गिक बदलाने शेतकऱ्यांचे आर्थिकतेचे चक्रही कोलमडले आहे. त्यामुळे सगळाच हंगाम लांबणीवर गेले आहेत. अवकाळीमुळे आंबा पीक ही घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अवकाळीने शेतकरी वर्गाच्या डोळ्यात अश्रू तराळत आहेत. आतापर्यंत अवकाळी आणि बदलत्या वातावरणाचा थेट परिणाम आंबा पिकावर झालेला आहे. निसर्गातील बदलामुळे काही नुकसान तर काही बाबी ह्या फायद्याच्याही झाल्या आहेत. आता तिसऱ्या टप्प्यातील मोहर लागण्याची अवस्था असतानाच थंडी वाढलेली आहे. त्याचा परिणाम मोहर लगडण्यावर होत आहे.

सुरुवातच संकटात झालेल्या यंदाच्या हंगामाला आता पडलेली गुलाबी थंडी दिलासा घेऊन आली आहे. या थंडीमुळे पीके बहरली तरच उत्पादनात वाढ होणार आहे. डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये येणाऱ्या आंब्याच्या मोहोरावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती आंबा बागायतदारांकडून वर्तविली जात आहे. डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये येणाऱ्या आंब्याच्या मोहोरावर होऊन मोहोर येण्याचा हंगाम नेहमीच्या तुलनेमध्ये पंधरा दिवस उशीरा लांबणीवर पडण्याची शक्यता आंबा बागायतदारांकडून व्यक्त केली जात आहे. आंब्याच्या झाडाला साधारणपणे आक्टोबर अखेर ते नोव्हेंबर या महिन्यात मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू होते व हि मोहोर येण्याची प्रक्रिया जानेवारी महिना अखेर पर्यंत सुरू रहाते. परंतु, यावर्षी अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण तसेच वादळी वाऱ्यामुळे अद्यापही मोहोर येण्यास सुरुवात झाली नाही. सध्याचे वातावरण बघता मोहोर प्रक्रियेस आणखी काही महिन्यांचा कालावधी जाणार आहे. फेब्रुवारी अथवा मार्च महिन्यात मोहोर येण्यास सुरुवात झाली तर फळधारणा साधारण तीन महिन्यांनी म्हणजेच जून महिना दरम्यान होईल व याच दिवसात ढगाळ वातावरण आणि पावसाचे दिवस सुरु होत असल्याने फळांवर किडी व रोगराई पसरण्याची शक्यता आहे. खराब आणि लहरी वातावरणामुळे या हंगामात आंबा उत्पादन घटण्याची भिती बागायतदारांनी व्यक्त केली आहे. मोहोर लांबणीवर पडल्यास साहजिकच, त्याचा आंबा व्यवसायातून होणाऱ्या उलाढालीवर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती बागायतदारांकडून व्यक्त केली जात आहे. जगातील लोकांचे सर्वात आवडते फळ आहे. दरवर्षी हंगामात आंब्यांना मोठी मागणी असते. दरम्यान, यावेळी आंबा खरेदी करण्यासाठी ग्राहकांना अधिकचा पैसा खर्च करावा लागणार आहे. कारण बदलत्या हवामानाचा पिकावर मोठा परिणाम झालाय. त्यामुळं उत्पादनात घट होणार आहे.

लोकसंसद

## महाराष्ट्रात परत एकदा निवडणूकीचा धुरळा उडणारं...मतदार राजा जागा हो

मुंबईसह महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी बिगुल वाजला आहे त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रात निवडणुकीचा धुरळा उडणार आहे महापालिकेच्या २२७ जागांसह एकूण २ हजार ८६९ जागांसाठी हि निवडणूक १५ जानेवारीला होत आहे तर १६ ला निकाल त्याचं पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वचं पक्षांची जोरदार तयारी सुरु केली असून सगळीकडे निवडणुकीचा ज्वर वाढत आहे सत्ताधाऱ्यांनी लाडकी बहिण योजना कार्यान्वित केली आहे लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा १५००/- रुपये देणारी ही योजना महाराष्ट्रात चांगलीचं चर्चेत आली असली तरी प्रामुख्याने जिवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करणे गरजेचे असताना हि योजना कार्यान्वित करुन बोळवण केली आहे सद्या झपाट्याने अनेक वास्तूंचे भाव गगनाला जावून भिडले आहेत काही ठिकाणी अतिवृष्टी तर कुठे दुष्काळ सदृष्टस्थिती यामुळे अनेक पिकांना फटका बसला आहे याच्याकडे सरकारचे लक्ष नाही फक्त आणि फक्त निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मतांचा जोगवा मागण्यासाठी असल्या योजना कार्यान्वित केल्या जात आहेत का? लाडक्या योजनेच्या मुद्यावरुन अनेक नेते विविध सभेतून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत नेटकॅफेमध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महिलांना तासन् तास ताटकळत रहावे लागते आहे त्यामुळे महिलांच्या कामाचे नियोजन कोलमोडले असून सरकारने असल्या योजना राबवण्यापेक्षा शाश्वत विकासाचे सार्वजनिक प्रश्न सोडवले पाहिजेत हि योजना ज्या महिला पात्र आहेत त्यांना लाभ मिळणारं आहे मग अपात्र आहेत त्यांचे काय ? तमाम महाराष्ट्रातील जनता लाडकी नाही काय ? असा देखिल सवाल विचारला जात आहे त्यासाठी सरकारने सार्वजनिक कामाला प्राधान्यक्रम देणे कधीही हिताचे ठरणारं आहे आज महाराष्ट्रात अपहरण, महागाई, खून, बलात्कार, भ्रष्टाचार, अपघात, मारामारी, बेरोजगारी असले प्रकार वाढत असताना सरकार फक्त निवडणूकीचा विषय घेवून सभा, विविध कार्यक्रमांचे इव्हेंट यामध्येचं गुंतले आहे त्यामुळे लोकप्रिय योजना राबवली म्हणजे जनतेचे प्रश्न सुटले असा त्याचा अर्थ होत नाही म्हणूनचं सद्याची निवडणूक सत्ताधाऱ्यांना सोपी राहिलेली नाही !


**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

दिनविशेष

# प्रसिद्ध पटकथाकार लेखक यशवंत जोशी

यशवंत गोपाळ जोशी हे मराठीतील एक लेखक आणि पटकथालेखक होते. 'अन्नपूर्णा' 'वहिनींच्या बांगड्या', 'शेवग्याच्या शेंगा', 'माझा मुलगा' या यशस्वी मराठी चित्रपटांच्या कथा आणि पटकथा जोशींच्या होत्या. त्यांचा जन्म १७ डिसेंबर १९०१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिगवण येथे झाला. जोशी यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथे झाले. आर्थिक ओढगस्तीमुळे इंग्रजी पाचवीत असतानाच त्यांनी शिक्षण सोडले. त्यानंतर त्यांनी अनेक नोकऱ्या केल्या. शाई, सुगंधी तेले तयार करून विकण्याचा तसेच वृतपत्रे विकण्याचा व्यवसाय केला. पुढे लेखनास सुरुवात केली व १९३४ मध्ये प्रकाशनव्यवसायास आरंभ केला.

'एक रूपया दोन आणे' ही त्यांची पहिली कथा यशवंत या मसिकात प्रसिद्ध झाली (१९२९). याच मासिकाच्या कथास्पर्धेत 'शेवग्याच्या शेंगा' या त्यांच्या कथेस प्रथम पारितोषिक मिळाले. पुनर्भेट (१९३२) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. वाचकांनी त्याचे उत्स्फूर्त स्वागत केले. १९३२ ते १९४३ पर्यंत या कथासंग्रहाचे सात भाग प्रसिद्ध झाले. तुळशीपत्र आणि इतर गोष्टी (१९३७), रेघोट्यांचे दैवत (१९४७), मायेच्या सावल्या (१९४७), जाई-जुई (१९४९) आणि तरंग (१९५०) हे त्यांचे काही इतर उल्लेखनीय कथासंग्रह. जिवंत अनुभवातून प्रकटलेली त्यांची कथा पांढरपेशा मध्यमवर्गीय जीवनाचे व्यक्ती-व्यक्तींतील भावसंबंधाचे जिव्हाळ्याचे चित्रण करते. परिणामाची उत्कटता सहजसुंदर संवाद साधी, प्रसन्न आणि अर्थपूर्ण भाषाशैली ही त्यांच्या कथालेखनाची काही लक्षणीय वैशिष्ठ्ये. तंत्र हे कथेच्या गळ्यात अडकलेले लोढणे, अशी त्यांची ठाम समजूत होती. 'ग्यानबा तुकाराम आणि टेक्निक' ह्या कथेतून त्यांनी तंत्राच्या हव्यासाचा उपहास केला आहे.



कथासंग्रहांखेरीज त्यांनी पडसाद (१९३८) सारख्या काही कादंबऱ्याही लिहिल्या. वहिनीच्या बांगड्या, शेवग्याच्या शेंगा ह्या त्यांच्या कथांवर आधारीत चित्रपट काढण्यात आले. दुधाची घागर हे त्यांचे आत्मचरित्रात्मक पुस्तक. त्यांच्या आईचे हृदयस्पर्शी शब्दचित्र त्यात त्यांनी रेखाटले आहे.

'अनंता परत आला', 'आवडत्या गोष्टी', 'औदुंबर आणि पारिजात', 'गजरा मोतियाचा','जाईजुई', 'तरंग', 'तुळशीपत्र आणि इतर गोष्टी', 'दुधाची घागर', 'दोन वजा एक', 'पडसाद', 'पुनर्भेट', 'भेळ', 'मायेच्या सावल्या', 'मीलन', 'रेघोट्यांचे दैवत','शेवग्याच्या शेंगा', 'श्रीकांत', 'संगीत श्रीमुखात', 'सुपारी', 'सात पावले', 'होमकुंड' इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली.

भारतीय संस्कृतीतील उदात्त मूल्यांवरील श्रद्धा आणि गतकाळातील वैभवाविषयी प्रेम त्यांच्या ललित लेखनातून प्रत्ययास येते. 'लेखक हा मार्गदर्शक दिवा आहे' ही त्यांच्या लेखनामागील भूमिका. त्यांच्या प्रसाद प्रकाशनातर्फे त्यांनी प्रकाशित केलेल्या अनेक दर्जेदार ग्रंथावरूनही हे जाणवते. शिवरामपंत परांजपे ह्यांचे काळातील निवडक निबंध, महाराष्ट्र, शब्दकोश, सोनोपंत दांडेकर संपादित ज्ञानेश्वरी, प्रा. रानडेकृत इंग्रजी-मराठी शब्दकोश ही त्यांची उल्लेखनीय प्रकाशने. संयुक्त महाराष्ट्र आणि महागुजरात ह्यांच्या समग्र माहितीचा ज्ञानकोशही त्यांनी प्रसिद्ध केला (१९६०). त्याच्या संपादकमंडळातही ते होते. प्रसाद ह्या मासिकाचेही ते एक संपादक होते. अशा या लोकप्रिय लेखकाचे ७ नोव्हेंबर १९६३ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ डिसेंबर

१) श्री.नलिनी मोहनलाल पारेख
बाजारपेठ, अलिबाग,
१७-१२-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

## मधुकर महाडिक यांना मातृशोक

**नागोठणे :** रोहाजवळील धामणसई गावच्या रहिवासी आणि गावातील महिला मंडळाच्या प्रमुख आधारस्तंभ लक्ष्मीबाई पांडुरंग महाडिक (१०३) यांचे नुकतेच वयोवृद्धत्वामुळे निधन झाले.



मूळचे धामणसई व व्यवसायानिमित्त नागोठणे येथे स्थायिक झालेले सामाजिक कार्यकर्ते मधुकर महाडिक आणि नंदकुमार महाडिक यांच्या त्या मातोश्री होत. लक्ष्मीबाई महाडिक यांच्या निधनाने पंचक्रोशीमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुना, मुलगी, जावई, नातवंडे, पातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य दि.१७ डिसेंबर रोजी राहत्या घरी धामणसई येथे होणार आहे. त्यानिमित्त वांदोली येथील ह.भ.प. दिनेश महाराज कडव यांच्या सुश्राव्य कीर्तन सेवेचे सकाळी १० वा. आयोजन करण्यात आल्याची माहिती मधुकर महाडिक यांनी दिली.

# सावरोली-खारपाडा रस्ता धोकादायक

## अनेक ठिकाणी पथदिवे, गतिरोधकांचा अभाव

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

सावरोली-खारपाडा हा रस्ता उत्तम दर्जाचा झाला असला तरी सुद्धा अनेक समस्यांच्या विळख्यात हा रस्ता गुंतलेला दिसत आहे. या मार्गावर येत असलेल्या गावांच्या ठिकाणी गतिरोधकाचा आभाव दिसून येत असून तुरळक ठिकाणी हे बसविण्यात आले आहे. त्याचबरोबर साईटपट्टी आणि वळणांवर रात्रीच्या वेळी अंधारामुळे या मार्गावरून रात्रीचा प्रवास अनेकांच्या जीवावर बेतत आहे. तीन दिवसापूर्वी माजगाव येथील पांडुरंग ढवाळकर रात्रपाळीच्या कामाला जात असताना अपघात होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना या परिसरातील ग्रामस्थांसाठी हळहळ व्यक्त करणारी आहे.



या मार्गावर औद्योगिकरणांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले असून वाहनाची रहदारी वाढली आहे. त्याचबरोबर नियोजित वेळेवर पोहचण्यासाठी वाहन अतिवेगाने चालवित असतात. परिणामी या मार्गांवर प्रवास करणाऱ्या व्यक्तींच्या जीवावर बेतत आहे. सीसीटीव्हीचा आभाव, वळणावर वाढलेले गवत झाडे, तसेच आदी लक्षणे अपघाताला कारणीभूत ठरत आहे. तसेच, वळणावर मोठ्या प्रमाणात अंधार असल्यामुळे पायी चालत असलेल्या व्यक्तीचा अपघात घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. याठिकाणी अनेक अपघात घडले असून याकडे मात्र सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. परिणामी हा रस्ता अपघाताचे केंद्रबिंदू ठरत आहे.

विशेष म्हणजे ज्या ठिकाणी अंधार असेल त्या ठिकाणी सौर उर्जेचे दिवे लावले तर अपघातात कोठेतरी अंकुश राहील. मात्र याकडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असल्यामुळे अपघाताची मालिका सातत्याने या ठिकाणी सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे. वाहनातून पडत असलेली माती किंवा बारीक खडी, केमिकल ऑईल गळती असे प्रकार या ठिकाणी सातत्याने घडत आहे. यामुळे हा रस्ता धोकादायक झाला आहे.

> सावरोली-खारपाडा या रस्त्याच्या संदर्भात तक्रारीचे निवारण करण्यात येईल. तसेच या ठिकाणी साईटपट्टी, झाडे-झुडपे, वाढलेले गवत काढण्यात येईल, ज्या ठिकाणी गतीरोधक नाही तो प्रस्ताव पुढे पाठवून योग्य तो निर्णय घेतला जाईल.
> - आकाश केंजळे, खालापूर अभियंता साबावि

> या मार्गावरून औद्योगिक वाहने, कर्मचारी बस यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वळणावरील अंधार, झाडे-झुडपे गतिरोधकाचा, सीसीटीव्ही कॅमेरा, पथदिवे यांचा अभाव यामुळे गेल्या अनेक वर्षात अनेक अपघात घडले आहे. संबंधित अधिकारी याकडे पाहणी करून मार्गे काढण्यात यावा.
> - जयवंत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती, खालापूर

## शिलाई मशिनचे आमिष दाखवून महिलांची फसवणूक

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

सरकारी योजनेतून शिलाई मशिन देण्यात येणार असल्याचे सांगून तालुक्यातील ४२४ महिलांकडून प्रत्येकी ६०० ते १,७०० रुपये प्रमाणे एकूण ३ लाख ६५ हजार ९७० रुपये उकळण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संतप्त महिलांनी सोमवारी चिपळूण पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार केली आहे.

या प्रकरणी सुभाष सकपाळ (रा. देवघर, ता. गुहागर) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. महिलांच्या तक्रारीनुसार, सुभाष सकपाळ याने चिपळूण तालुक्यातील महिलांना सरकारी योजनेखाली शिलाई मशिन मिळेल, असे सांगून नोंदणी व प्रक्रिया शुल्काच्या नावाखाली पैसे घेतले. २० ते २५ दिवसांत मशीन मिळेल, असे आश्वासनही देण्यात आले. मात्र, कालावधी उलटून गेला तरी कोणत्याही महिलेला शिलाई मशीन देण्यात आली नाही. याबाबत विचारणा केल्यावर सकपाळ याच्याकडून टाळाटाळीची उत्तरे दिली जात होती. फसवणुकीचा संशय बळावल्याने संतप्त महिलांनी मुंबई-गोवा महामार्गावरील शिवाजीनगर बसस्थानक परिसरातील एका खासगी कार्यालयावर धडक दिली. यावेळी महिलांनी सकपाळ याला जाब विचारत तीव्र संताप व्यक्त केला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन सकपाळ याला ताब्यात घेत त्याची चौकशी सुरू केली आहे.

## नवी मुंबईत नवीन रेल्वे स्थानक

### उरण मार्गावरील रेल्वे प्रवासाला नवी दिशा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी एक महत्त्वाची सुविधा देण्यात आली आहे. नवी मुंबई मार्गावर नवीन स्टेशन उभारण्यात आले आहे. बेलापूर-नेरूळ-उरण या रेल्वे मार्गावर तारघर हे नवीन रेल्वे स्थानक उभे राहिले असून यासाठी १०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या स्थानकामुळे उरण मार्गावरील रेल्वे प्रवासाला नवी दिशा मिळाली असून, भविष्यात हे स्थानक विमानतळावर जाणाऱ्या प्रवाशांसाठी प्रमुख मार्ग ठरणार आहे.



तारघर स्टेशन हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अगदी जवळ आहे. त्यामुळे विमानतळ सुरू झाल्यावर या परिसरातील लोकसंख्या, व्यावसायिक वसाहती आणि प्रवाशांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. या भागातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने ही पायाभूत सुविधा उभारली आहे.

तारघर हे नवं स्टेशन कार्यान्वित झालं असून याशिवाय उरण मार्गावर आणखी एक महत्त्वाची सुविधा प्रवाशांच्या सेवेत देण्यात आली आहे. बेलापूरनेरूळउरण मार्गावर लोकलच्या फेऱ्यांमध्येही वाढ करण्यात आली आहे. लोकलच्या फेऱ्या वाढवल्यामुळे प्रवाशांची गर्दी कमी होईल आणि पीक अवरमध्ये प्रवास करणं अधिक सोपं, सुखकर होईल. तारघर स्टेशन सुरू झाल्यामुळे कामोठे, उलवे, बामणडोंगरी परिसरातील रहिवाशांना थेट रेल्वे सेवेचा फायदा मिळणार आहे.

## सिंधुदुर्ग किल्ल्याजवळ सागरी स्वच्छता मोहीम

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

सिंधुदुर्ग किल्ल्याभोवतालच्या जैवविविध प्रवाळ (कोरल) परिसंस्थेत सागरी कचरा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. वनशक्तीच्या सागरशक्ती यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत सुमारे ४०० किलो सागरी कचरा संकलित करण्यात आला.



या उपक्रमाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे अर्थसहाय्य लाभले असून मॅंग्रोव्ह सेल, राज्य मत्स्य व्यवसाय विभाग, मालवण नगर परिषद, युथ बीट्स फॉर क्लायमेट आणि नीलक्रांती यांच्या सहकार्याने ही मोहीम पार पडली.

स्थानिक प्रशिक्षित स्कुबा डायव्हर्स यांच्या मदतीने समुद्रतळातील कचरा अत्यंत काळजीपूर्वक गोळा करण्यात आला. यामध्ये घोस्ट नेट्स, प्लास्टिक बाटल्या, कॅन्स, प्लास्टिक पिशव्या, काचेच्या बाटल्या तसेच बोटींचे फायबरचे तुकडे आढळून आले.

या मोहिमेमुळे जमिनीवर चुकीच्या पद्धतीने व्यवस्थापित केलेला कचरा थेट समुद्रात पोहोचून सागरी जीवसृष्टीला गंभीर धोका निर्माण करत असल्याचे स्पष्ट झाले. सागरशक्ती व वनशक्ती संस्थांनी सागरी परिसंस्था जपण्यासाठी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले.

## राधाकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळे येथील श्री देव राधाकृष्ण नामदेव मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला. तळे येथील नामदेव शिंपी समाजाच्या १२२ वर्षे पूर्वी बांधण्यात आलेल्या श्री राधाकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार दोन वर्षापूर्वी अध्यक्ष महेंद्र कजबजे व त्यांचे सहकारी बांधकाम कमिटीच्या माध्यमातून करण्यात आला. अतिशय सुंदर मंदिर परिसर व कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल बांधण्यात आला. त्यामुळे धार्मिक कार्यक्रम, लग्न सोहळे व इतर उपक्रमासाठी जागेची उपलब्धता झाली. या मंदिरात धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते. मंदिराचा जीर्णोद्धार द्वितीय वर्षी करीत असताना मंगळवारी (दि.१६) पहाटे काकड आरतीचे आयोजन केले होते. दुपारी भजन व त्यानंतर महाप्रसाद देण्यात आला. सायंकाळी शेजारतीनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



## नैराश्यातून बारावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यात लांजा येथे एका युवतीने आत्महत्या केली. लांजा पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बारावीच्या परीक्षेत कमी गुण मिळाल्याने व दोन विषयांत नापास झाल्यामुळे या मुलीने हा टोकाचा निर्णय घेतल्याचा प्राथमिक अंदाज आहे. युवतीने आपल्या घरातच किटकनाशक प्राशनकरून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे.

मुलीने किटकनाशक घेतल्याचे लक्षात येताच, तिच्या घरच्यांनी तातडीने तिला लांजा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिची प्रकृती गंभीर होती. त्यामुळे, पुढील उपचारासाठी तिला रत्नागिरी आणि त्यानंतर कोल्हापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, पालकांच्या प्रयत्नांना काही यश मिळाले नाही आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

## शिक्षकांनी गिरविले सकारात्मक शिस्तीचे धडे

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

राज्यात काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेचे प्रकार समोर येत असून समाजात याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि शिक्षकविद्यार्थी नातेसंबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने शालेय शिक्षण विभागाने नुकतेच डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सकारात्मक शिस्त याविषयी विशेष शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात यावे, असे आदेश दिले होते. त्यानुसार नाडसुर केंद्राची केंद्रस्तरावरील शिक्षण परिषद केंद्र शाळा नाडसुर येथे सोमवारी (दि.१५) संपन्न झाली.



या विशेष शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर विशेष सत्राचे आयोजन केले होते.

या मार्गदर्शन सत्रामध्ये केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. शारीरिक शिक्षेबाबत शिक्षण अधिकार अधिनियमातील तरतुदी व शिक्षकांची जबाबदारी, शिक्षेचे प्रकार व स्वरूप, शिक्षेचे परिणाम, शिक्षेचा मनावर व मेंदूवर होणारा परिणाम, विविध शैक्षणिक विचारवंत व त्यांचे सकारात्मक शिस्तीचे विचार, सकारात्मक शिस्त तत्वे व त्यांची अंमलबजावणी, संवाद सहकार्य व समुपदेशन यावर आधारित वर्ग व्यवस्थापन, योग्य शिस्तीचे मार्ग, सकारात्मक शिस्तीचे तंत्र व उपक्रम आदी मुद्द्यांच्या अनुषंगाने या शिक्षण परिषदेमध्ये केंद्रातील सर्व शिक्षकांना सुलभन केले.

### पौष्टिक भाज्यांचा शालेय आहारात समावेश | विविध फळभाज्या, पालेभाज्याची लागवड

# जि. प. शाळांतील परसबाग बहरल्या

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांतील परसबाग बहरल्या आहेत. प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण अंतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये तालुकास्तरीय परसबाग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सुधागड तालुक्यातील सर्वच शाळांनी आपला सहभाग नोंदवला. पाच्छापूर, सागवाडी व तिवरे जिल्हा परिषद शाळांनी सुयश मिळवले असून या शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेचे परीक्षण तालुकास्तरावरून करण्यात आले. यामध्ये राजिप पाच्छापूर शाळेचा प्रथम क्रमांक, राजिप सागवाडी शाळेचा द्वितीय क्रमांक व राजिप तिवरे शाळेचा तृतीय क्रमांक पटकवला. तसेच सिद्धेश्वर, रासळ आदीवासीवाडी व भेलीवसावे या जिल्हा परिषद शाळांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे.



तालुक्याच्या गट विकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, विस्तार अधिकारी व पोषण अधीक्षक नवनाथ साबळे यांनी सर्व विजेत्या शाळांना शुभेच्छा दिल्या. तसेच पेडली व नाडसूर केंद्राचे केंद्रप्रमुख अनिल राणे यांनी शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांनी केलेल्या मेहनतीबद्दल कौतुक केले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळांच्या परिसरात असलेल्या या परसबागांमध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या व पालेभाज्या यांची लागवड केलेली आहे. ज्यामध्ये भेंडी गवार, वांगी, पालक, दुधी, शिराळे व कारले यासह टोमॅटो आणि इतर भाज्या व फळ व फुलझाडांचा समावेश आहे. या सर्व परसबागांची येथील शिक्षक व विद्यार्थी अतिशय उत्तम प्रकारे निगा राखतात.

### परसबागेची वैशिष्ट्ये

या परसबागा शाळेजवळ व शाळेच्या परिसरात आहेत. त्यामुळे भाजीपाला व झाडांना पाणी देणे, निगा राखणे, तण काढणे सहज सोपे होते. या परसबागांची रचना अशी आहे की कमी जागेत जास्तीत जास्त भाज्या, फुले किंवा औषधी वनस्पती लावता येतात. परसबागेमुळे शाळेला रोजच्या पोषण आहारासाठी ताजी, रसायनमुक्त आणि पौष्टिक भाजी मिळते. रासायनिक खतांपेक्षा सेंद्रिय खतांचा वापर जास्त असतो, त्यामुळे खर्च कमी व पर्यावरण हितकारी. परसबाग ही शाळेसाठी एक उपयुक्त व आनंददायी शिकण्याचे केंद्र आहे.

> शाळेतील शिक्षकांसह विद्यार्थी परसबाग फुलवण्यासाठी मेहनत घेतात. याद्वारे स्वच्छ व ताजा भाजीपाला मिळतो. परसबाग फुलवण्यासाठी वापरलेल्या सेंद्रिय खतामुळे या भाज्या आरोग्यासाठी चांगल्या असतात. कमीत कमी खर्चात जास्त उत्पादन मिळते. शिवाय मुलांमध्ये शेतीविषयक आवड निर्माण होते. स्वकष्टातून उभारणी केल्यामुळे अन्नाची किंमत कळते.
> - अनिल राणे, केंद्रप्रमुख, पेडली व नाडसूर केंद्र

## निवडक



### सारडेचा स्वप्नोज भारतीय सेनेत दाखल

**चिरनेर :** उरण तालुक्यातील सारडे येथील हातावर पोट असणाऱ्या कुटुंबातील स्वप्नोज शशिकांत म्हात्रे हा भारतीय सेनेत अग्निवीर म्हणून दाखल झाला आहे. यासाठी त्याने नाशिक येथे गरुड झेप अकॅडमीत तीन वर्षे प्रशिक्षण घेतले. तेथे त्याने फिटनेस आणि भारतीय सेनेत दाखल होण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्याने अग्निवीर म्हणून परीक्षा दिली. नुकतेच त्याने आठ महिन्यांचे प्रशिक्षण हैदराबाद येथे घेतले. तेथे तो १८४० प्रशिक्षणार्थींत फायरिंगमध्ये पहिला आला आहे. त्यामुळे त्याची नुकतीच भारतीय सेनेत हिमाचल प्रदेशमध्ये निवड झाली आहे. भारती सेनेत दाखल होणारा स्वप्नोज हा सारडे गावातील पहिलाच तरुण आहे. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तके देऊन स्वप्नोजचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

### आदिवासी, गरजूंना ब्लँकेटचे वाटप



**नेरळ :** कर्जत तालुक्यातील वंजारपाडा येथील राधा मीरा चॅरिटेबल ट्रस्ट येथे ट्रस्टचे अध्यक्ष भरत मेहरा यांच्या माध्यमातून वर्षभर सुरु असलेल्या सामाजिक बांधिलकीच्या कामामुळे यावर्षी हिवाळ्यात अधिक प्रमाणात ब्लँकेट वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील जनतेसाठी ३००० ब्लँकेट वाटप करण्याचा संकल्प केला आहे. ट्रस्टच्या कार्यकर्त्यांकडून या भागातील आदिवासी वाड्या झेंड्याची वाडी, उंबरवाडी, गिऱ्याचीवाडी, चिंचवाडी, गुडवणवाडी, तसेच आजूबाजूच्या परिसरातील उपस्थित सर्वांना ब्लँकेट व साडीचे वाटप करण्यात आले. तसेच जितेवाडी आणि कुंभेवाडी येथे ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या ट्रस्टच्या माध्यमातून दरवर्षी अनेक वस्तूंचे वाटप केले जात असते. त्यात हिवाळ्यात थंडीपासून बचाव व्हावा म्हणून ब्लँकेट तसेच उन्हाळ्यात पाण्याची टंचाई लक्षात घेऊन पाण्याचे टँकर तीन ते चार महिने सुरु असतात. तर पावसाळयात हजारो छत्र्या आणि रेनकोटही ट्रस्ट दरवर्षी देत असते.

### एलईडी मासेमारी करणाऱ्या नौका जप्त

**रत्नागिरी :** एलईडी प्रकाशाचा वापर करून बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या दोन नौकांवर सहाय्यक मत्स्य व्यवसाय विभागाच्या गस्ती पथकाने कारवाई केली आहे. ही कारवाई रविवारी रात्री पूर्णगड समुद्र परिसरात करण्यात आली. 'महिन' नावाची मासेमारी नौका एलईडी दिवे लावून मासेमारी करत असल्याचे रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आले. गस्ती नौकेतून गस्त घालत असताना मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी लतिका गावडे व सहाय्यक मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी रसिका सावंत यांच्या पथकाने ही कारवाई केली. 'महिन' ही नौका मोहसीन वस्ता यांच्या मालकीची असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापूर्वी दहा दिवसांपूर्वी मध्यरात्रीच्या सुमारास रत्नागिरी समुद्रात गस्तीदरम्यान 'हर्षाली' नावाची मासेमारी नौकाही एलईडी प्रकाश वापरताना आढळून आली होती. ही नौका प्रविण दळवी यांच्या मालकीची असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. दोन्ही कारवायांमध्ये एलईडी दिवे, जनरेटर व अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून संबंधित नौका मिरकरवाडा बंदरात अटकावून ठेवण्यात आल्या आहेत.

### लोक अदालतीत प्रलंबित प्रकरणे निकाली

**कल्याण :** जिल्हा पातळीवर आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी ८ हजार प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली. महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ११ कोटी ९४ लाख रुपयांचा भरणा केला. कल्याण परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी एकूण २ लाख ३५ हजार वीज ग्राहकांना नोटीस पाठविण्यात आली होती. त्यापैकी सुमारे ८ हजार ग्राहक उपस्थित होते. महावितरण आणि वीज ग्राहक यांच्यात तडजोड होऊन ११.९४ कोटी रुपये इतका भरणा करण्यात आला. यात कल्याण मंडल एकमध्ये २८ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन १९ लाख रुपयांची वसुली झाली. कल्याण मंडल २ मध्ये २३८५ प्रकरणे सर्वाधिक ८ कोटी ६ लाख रुपयांच्या वसुलीने सामोपचाराने मिटवण्यात आली. वसई मंडलात ४ हजार ३६९ प्रकरणांच्या निपटाऱ्यातून २ कोटी ११ लाख रुपयांची वसुली होऊ शकली. तर पालघर मंडल कार्यालयांतर्गत ९ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या २२७ ग्राहकांची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी एकूण १४ हजार ९७ वीज ग्राहकांना नोटीस पाठविण्यात आली होती. महावितरण व वीज ग्राहक यांच्यात तडजोड होऊन १ कोटी ४० लाख रुपये इतका भरणा करण्यात आला. यात ठाणे मंडलमध्ये ६५ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ४.६२ लाख रुपयांची वसुली झाली. पेण मंडलात ९ प्रकरणात तडजोड होऊन ६.६८ लाख रुपयांची वसुली झाली. तर, वाशी मंडलात ०१ हजार २५२ प्रकरणांच्या निपटाऱ्यातून सर्वाधिक १ कोटी २९ लाख रुपयांची वसुली झाली आहे.

### द्वारकानाथ हनुमंते यांचे निधन



**रसायनी :** चौक शहर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांचे वडील आणि चौक परिसरातील पहिल्या पिठाच्या चक्कीचे प्रणेते द्वारकानाथ रामचंद्र हनुमंते यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. चौक परिसरातील आणि चौक गावातील पहिल्या पिठाच्या चक्कीचे ते संस्थापक आहेत. द्वारकानाथ हनुमंते यांना वृत्तपत्र आणि साहित्य वाचनाची आवड होती. व्यापार करताना त्यांनी शेतीच्या विकासासाठी आणि शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले. एक आदर्श व्यतिमत्व म्हणून ते परिचित होते. त्यांच्या पश्चात मुलगा चौक व्यापारी असोसिएशन अध्यक्ष हर्षल हनुमंते, पत्नी, दोन विवाहित मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# कारशेडसाठी मातीचे ढीग



■ बाहेरून आणलेली माती सध्या चर्चेचा विषय

■ रॉयल्टीचे बुडविला जात असल्याचा ठपका

| नेरळ | प्रतिनिधी |

मध्य रेल्वेच्या मुंबई पुणे या मेन लाईनवरील भिवपुरी रोड ते कर्जत या मार्गावर मध्य रेल्वेकडून कारशेड उभारले जात आहेत. कारशेडसाठी रेल्वे मार्गाच्या बाजूला १०० ते १५० मीटर एवढी जमीन रेल्वेकडून घेतली जात आहे. सध्या ज्या जमिनीवर कारशेड उभे राहणार आहे त्या जमिनीवर किरवली, उमरोली, चिंचवली या तीन ग्रामपंचायत मधील शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत.

मध्य रेल्वेकडून कर्जत दिशेकडे आठ किलोमीटर भागात कारशेड उभे केले जाणार आहे. भिवपुरी रोड ते कर्जत या दरम्यान हे नवीन कारशेड उभारले जाणार आहे. नवीन रेल्वे कारशेड कामाला मागील काही दिवसापासून गती मिळाली आहे. मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकण्याचे काम सुरु आहे. मात्र हा मातीचा भराव भिसेगाव येथून उचलून आणण्यासाठी किरकोळ प्रमाणात 'रॉयल्टी' भरली जात असल्याचे माहिती समोर येत आहे. दरम्यान 'रॉयल्टी' भरण्याचे तसदी मातीचा भराव टाकण्याचे काम मिळविणारा ठेकेदार घेतांना दिसत नाही. त्यामुळे शासनाचा महसूल बुडवण्याचा प्रकार महसूल विभाग रोखणार का? असा प्रश्न सर्वसामान्य विचारात आहेत.

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत दिशेकडे रेल्वेकडून कारशेड उभारले जात आहे. मध्य रेल्वकडून २०२१ मध्ये वसई-विरार भागात कारशेड उभे राहिल्यानंतर कर्जत मार्गावर नवीन कारशेड उभारण्यास मंजुरी दिली आहे. मध्य रेल्वेवरील सर्वात मोठे कारशेड बनणार असून साधारण सात ते आठ किलोमीटर अंतरात हे नवीन कारशेड असणार आहे. या कारशेडचे कामाला सुरुवात झाली असून मातीचा भराव टाकून जमीन सपाट करण्याचे काम केले जात आहे. मात्र त्या कामासाठी बाहेरून आणली जाणारी माती सध्या चर्चेचा विषय बनली आहे.

सध्या भिसेगाव भागातून माती आणली जात असून दररोज शेकडो ब्रास माती तेथे टाकण्यात येत आहे. मात्र बाहेरून उचलली जाणारी मातीसाठी शासनाच्या महसूल विभागाला स्वामित्व शुल्क म्हणजे 'रॉयल्टी' भरावी लागते. परंतु भिसेगाव येथील मातीच्या खोदकामाला जेमतेम 'रॉयल्टी' महसूल विभागला भरली असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे शासनाचा महसूल बुडवून रेल्वेच्या कामासाठी मातीचा भराव टाकला जात आहे.

कारशेडसाठी दररोज माती घेऊन येणारे ट्रकसाठी खास रस्ता बनविण्यात आला आहे, त्याच रस्त्यासाठी काही शेकडो ब्रास माती लागली असेल. त्यामुळे भिसेगाव येथील जमिनीतून माती उचलण्यासाठी भरलेली 'रॉयल्टी' हि त्याच रस्त्यासाठी संपल्याची कुणकुण स्थानकात सुरु आहे. तर दुसरीकडे दररोज हपणारी मातीची चाल यासाठी लागणारे 'रॉयल्टी'संबधात कामाचे ठेकेदार कधी भरणार? असा सवाल स्थानिक शेतकरी विचारात आहेत. त्यामुळे 'रॉयल्टी' चुकवून मातीचा होत असलेला भराव हि महसूल खात्यासाठी मोठी डोकेदुखी बनू शकते. त्यामुळे हि 'रॉयल्टी' चुकवून सुरु असलेले वाहतूक महसूल विभाग रोखणार आहे काय? असा सवाल उपस्थित झाला आहे.

### कळवा कारशेडचा भार होणार कमी

मध्य रेल्वेच्या कळवा कारशेड येथे असलेले कारशेडवर आलेला भार कमी करण्यासाठी २०११ मध्ये कारशेड बनविण्यात आले. त्यानंतर मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील उपनगरीयच्या वाहतुकीस सुसुत्रता आणण्यासाठी कर्जत कारशेड बनविण्याचे रेल्वेकडून जाहिर करण्यात आले होते. त्यानुसार आता खऱ्या अर्थाने कर्जत कारशेडचे काम सुरु झाले आहे. या कारशेडसाठी कर्जत मार्गावरील भिवपुरी रोड स्थानकाच्या पुढे असलेल्या डिकसळ गावातून सुरु होणारे कारशेड कर्जत येथे दहा किलोमीटर या भागात हे कारशेड उभारले जाणार आहे.

## कुष्ठरोग शोध अभियान यशस्वी

| अलिबाग | प्रतिनिधी |

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी तसेच सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. प्राची नेहूलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ नोव्हेंबर ते दि.०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आलेले कुष्ठरोग शोध अभियान यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. नवीन आढळून आलेल्या रुग्णांमध्ये ६१ सांसर्गिक तर ९० असांसर्गिक रुग्णांचा समावेश आहे. संबंधित सर्व रुग्णांना तात्काळ शासकीय आरोग्य संस्थांमार्फत मोफत औषधोपचार सुरू करण्यात आले असून नियमित फॉलो-अप, समुपदेशन व आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात येत आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेत निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, असे आरोग्य प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा आरोग्य यंत्रणा, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्यामुळे हे अभियान यशस्वी ठरल्याचे प्रशासनाने नमूद केले.

## निवडक



### वाशीत माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**खांब** : राजिप प्राथमिक शाळा वाशी येथे माजी विद्यार्थी संघाचा स्नेहमेळावा आणि शाळेचा वर्धापन दिन सोहळा रविवार (दि.१४) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यास माजी विद्यार्थी सुरेश मगर, अरविंद मगर तसेच सर्व माजी विद्यार्थी संघांचे सदस्य, ज्येष्ठ ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती सर्व पदाधिकारी व सदस्य, पालक उपस्थित होते. या मेळाव्या माजी विद्यार्थ्यांचे स्वागत, कलागुणाचे सादरीकरण, मनोगत, शाळेच्या विकासासाठी सहभाग आणि अल्पोपहार असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी विविधप्रकारे सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन मुख्याध्यापिका वैशाली सलागरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पालक, विद्यार्थी आणि ज्येष्ठ शिक्षिका कोठेकर यांनी मेहनत घेतली.



### श्री बापदेव महाराज मंदिराचा जीर्णोद्धार

**नागोठणे** : समस्त नागोठणेकरांचे श्रद्धास्थान आणि परीट धोबी समाजाचे आराध्य दैवत श्री बापदेव महाराज मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा नुकताच धार्मिक वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्याचा पूजा विधीचा मान शांताराम घाग, भास्कर घाग, सुरेश घाग, सागर घाग व दीपक घाग यांच्या दाम्पत्यांना मिळाला. या धार्मिक विधीचे पौरोहित्य झाप (पाली) येथील सदाशिव जंगम स्वामी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. या सोहळ्यास भाई टके, सदानंद गायकर, मधुकर ठमके, चंद्रकांत गायकवाड, गणपत म्हात्रे, सुरेश देवरे, विलास चौलकर, डॉ मिलिंद धात्रक, संतोष नागोठणेकर, रोहिदास हातलोनकर, यशवंत शिर्के, चंद्रकांत भोईर, रामचंद्र देवरे, पोशा रागटी आदींसह अनेक मान्यवर, नागोठण्यासह खास मुंबई, ठाणे येथून आलेले समाजबांधव व ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

### अध्यक्षपदी सुदर्शन सावंतांची निवड

**अलिबाग** : अलिबाग तालुका ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदाच्या



निवडीसाठी सर्वसाधारण सभा डिसेंबर (दि.१५) रोजी पार पडली. या सभेस तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभे दरम्यान अध्यक्षपदासाठी सुदर्शन दत्तात्रय सावंत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मागील सहा महिन्यांपासून रिक्त असलेले अलिबाग तालुका तलाठी-मंडळ अधिकारी संघाचे अध्यक्षपद अधिकृतपणे भरले गेले. नवीन अध्यक्षांच्या निवडीमुळे तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या विविध अडचणी, समस्या व प्रलंबित प्रश्न सोडविण्यास गती मिळणार असून संघटनेच्या कार्याला नवे बळ मिळेल, अशी भावना उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली.



### राष्ट्रीय लोक अदालतीस प्रतिसाद

**नागोठणे** : रोहा न्यायालयातील लोक अदालतीमध्ये दाखल व वादपूर्व प्रकरणे ठेवून ती तडजोडीने मिटविण्याचे आवाहन पक्षकारांना करण्यात आले होते. त्यास पक्षकारांनी चांगला प्रतिसाद दिल्याने एकूण २५९३ प्रकरणांपैकी १२५९ प्रकरण सामंजस्याने व तडजोडीने मिटवून निकाली काढण्यात आली. त्यामधून एकूण ५५ लाख, ५ हजार, १५० रुपयांची वसुली झाल्याने रोहातील लोक अदालतीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे पहावयास मिळाले. तसेच या लोक अदालतीमध्ये तीन जोडप्यांचा वैवाहिक जीवनातील वाद तडजोडीने मिटविण्यात आल्याने त्यांच्या संसाररुपी वेलीवरील फुल पुन्हा एकदा फुलल्याचे पहावयास मिळाले. या जोडप्यांचा सत्कार न्यायाधीश एस. व्ही. खैरे यांच्या हस्ते गुलाब पुष्पाचे रोपटे देऊन करण्यात आला. रोहा येथील कनिष्ठ स्तर दिवाणी व फौजदारी न्यायालयात (दि.१३) डिसेंबरला संपन्न झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आलेल्या दिवाणी व फौजदारी प्रलंबित असलेल्या १६०१ खटल्यांपैकी ३०५ खटल्यांतून १४७ खटले तडजोडीने निकालात काढण्यात आली. यामधून ५३ लाख ८ हजार, ४५१ रुपये एवढी रक्कम तडजोडीअंती जमा झाली.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४
- हातगाडी विकणे आहे. संपर्क : नम्रता -७७४४०९८५५४
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- विद्यानगर अलिबाग येथे कॉटेजमध्ये कामाकरीता महिला पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६/८३९०४२४२२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## आगरी समाज संस्थेतर्फे रक्तदान शिबीर



| अलिबाग | प्रतिनिधी |

आगरी समाज संस्था अलिबाग, यांच्या पुढाकाराने तसेच कच्छ युवक संघ व लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने रविवार (दि.१४) डिसेंबर रोजी कच्छी भवन, श्रीबाग-अलिबाग येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात आगरी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील, प्रभाकर ठाकूर, जयवंत थळे, मेहुल पाटील, नयन कवळे, महेंद्र पाटील, भावेश पटेल यांनी रक्तदान करून रक्तदात्यांना प्रेरणा दिली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपाध्यक्ष सुनील तांबडकर, खजिनदार अॅड. सचिन पाटील, उदय म्हात्रे, राजेंद्र पाटील, वैभव पाटील, मनोहर पाटील, बिपीन टेमकर, श्रेयस ठाकूर तसेच कच्छ युवक संघचे धर्मेश देडिया व भावेश पटेल यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, कबन नाईक, अनंत म्हात्रे, शशिकांत मिठाग्री, प्रकाश मिठाग्री, प्रल्हाद पाटील, अॅड. रत्नाकर पाटील, तुषार थळे, विकास पाटील, समीर मालोदे, जितेंद्र मेहता, अंकुश पाटील यांनी उपस्थित राहून आयोजकांचे मनोबल वाढवले. शिबिरास जिल्हा रक्तपेढी अलिबागच्या डॉ. भैरवी मालवणकर, मनोहर हाडस, जयश इदाते, वैभव कांबळे, रामकुमार निकस, स्वप्निल जगताप, पूनम पाटील, महेश घाडगे व बाबासाहेब पोटे यांचा समावेश होता. या शिबिरात एकूण ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. प्रत्येक रक्तदात्याला प्रमाणपत्र देण्यात आली.

## आगरी बोलीभाषा साहित्य संमेलन

| चिरनेर | प्रतिनिधी |

डोंबिवली येथे सोमवारी (दि.१५) डिसेंबर रोजी वासुदेव महाराज म्हात्रे व्यासपीठावर २१ वे.अखिल भारतीय आगरी महोत्सव, माझी मायबोली आगरी, राज्यस्तरीय आगरी बोलीभाषा साहित्य संमेलनाचे आयोजन गुलाब वझे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. नियोजित आगरी महोत्सव व आगरी साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी भूषविले होते. याप्रसंगी डॉ. श्रीपाद जोशी, जगन्नाथ पाटील, एल. बी. पाटील तसेच विविध साहित्य संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील मंडळींसह आगरी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## कर्जत तहसीलदारांना निवेदन



| नेरळ | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेच्या वतीने राज्यभर आंदोलने केली जात आहेत. सोमवार (दि.१५) डिसेंबरपासून राज्यभर आयटी उपकरणांवरील ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला आहे. शासनाकडून प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे राज्यस्तरीय व्यापक आंदोलन हाती घेण्यात आले आहे. दरम्यान, कर्जत तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी करीत मध्ये आंदोलन सुरू केले असून महसूल खात्याचे गाव पातळीवरीप अधिकारी कर्मचारी संपावर गेल्याने व्यवहार ठप्प झाले आहेत.

राज्य तलाठी संघटनेचे वतीने आंदोलन छेडण्यात आले असून आपल्या प्रलंबित मागण्यासाठी कर्जत तालुक्यातील तलाठी आणि मंडळ अधिकारी संपावर गेले आहेत. कर्जत तालुका ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण गवई यांच्या नेतृत्वाखाली कर्जत तहसीलदार डॉ धनंजय जाधव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष संतोष जांभळे, किरण बेलोस्कर, पार्वती वाघ, वैशाली पाटील, कल्याणी खाडे, गोपाल गाडेकर, संकेत कदम, संग्राम चव्हाण, आकाश काळे, अंजना मावळणकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



● पनवेल शहरात 'जंगल वाचवा' हा संदेश देण्यासाठी उन्नती ब्रिजच्या भिंतींवर चित्र साकारली आहेत.
(छायाचित्र राजेश डांगळे)

## पसंतीच्या क्रमांकांसाठी वाहन प्रेमींना संधी

| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे चारचाकी वाहनांसाठी चालू असलेली एम एच ४६ डीए ही मालिका संपुष्टात येणार असल्याने एम एच ४६ डीएफ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. यासाठी ज्यांना चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी (दि.२३) डिसेंबर रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते दुपारी २.३० या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल जयंत चव्हाण यांनी केले आहे.




एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी २३ डिसेंबर रोजी सायं. ४ वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन २४ डिसेंबर रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० वाजेपूर्वी त्यांच्या इच्छेप्रमाणे जास्तीच्या रकमेचा धनाकर्षण (डीडी) बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा. या अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ३.३० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

## जयराम पाटील यांचे निधन

| अलिबाग | प्रतिनिधी |



आंबेपूर (दिवलांग) येथील आगरी समाजातील ज्येष्ठ शेतकरी, जयराम बारक्या पाटील (वय ८६) यांचे सोमवार (दि.८) डिसेंबर रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांचा संस्कृती, परंपरा आणि सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग असे. ते शेतीवर आणि स्व-कष्टावर नितांत प्रेम करणारे पाटील, 'हंदा फौज' आणि 'परकेल' सारख्या सामूहिक शेती कामांमध्ये सक्रिय होते. त्यांच्या निधनाने पाटील कुलदैवत बंधू, दिवलांग, तसेच ९ गाव विस्तारित शेतकरी सामाजिक संस्था आणि अनेक गावांतील संस्थांनी त्यांना उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

दुर्गप्रेमी मिलिंद जाधवांची धाडसी प्रेरणादायी कामगिरी | दोरीच्या साहाय्याने कडा उतरण्याचे गिर्यारोहकांचे स्वप्न

# रौद्रभिषण कोकणकड्याची आव्हानात्मक मोहीम

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

लाव्हारसातून उत्पत्ती झालेली महाराष्ट्रातली सह्याद्री पर्वताची अजस्त्र रांग म्हणजे निसर्गाच्या रौद्ररूपाचं एक अद्भुत आश्चर्य. यातला हरिश्चंद्र-कळसुबाई रांगेतला सर्वाधिक १८०० फूट उंचीचा महाकाय रौद्रभीषण कोकणकडा गिर्यारोहकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू मानला जातो. दोरीच्या साहाय्याने हा कडा उतरण्याचा थरार अनुभवणं हे प्रत्येक गिर्यारोहकाचं स्वप्न असते. गिर्यारोहकांना या थराराची प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी डोंबिवलीतल्या सह्याद्री रॉक डवेंचर या संस्थेने रविवार (दि.१४) डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या या मोहिमेत श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन गावचे दुर्गप्रेमी मिलिंद जाधव यांनीही सहभाग घेतला होता.

हा थरार अनुभवण्यासाठी हरिश्चंद्र गडालगत असलेल्या कोकण कड्यावर पोहोचावे लागते. अहिल्यानगर जिल्ह्याच्या





अकोला तालुक्यातील हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचनई गावातून पहाटे साडेतीन वाजता कडाक्याच्या थंडीतून या मोहिमेला सुरुवात होते. साडेपाच वाजता हरिश्चंद्रगडाच्या माथ्यावर पोहोचल्यावर गडदर्शन आणि चहा नाश्ता आटपून कोकण कड्यावरचा भन्नाट वारा आणि बोचर्या थंडीतच गिर्यारोहकांना या मोहिमेबद्दल माहिती आणि सुरक्षेची साधने देऊन सुसज्ज करण्यात येतं. त्यानंतर तीन टप्प्यात अवरोहण होणाऱ्या या मोहिमेतले सहभागी सदस्य आयोजकांच्या सूचनांचं काटेकोरपणे पालन करत कड्यावरून खाली उतरण्याचा थरार अनुभवत एका पाठोपाठ एक कोकणकड्याच्या पायथ्याशी यशस्वीरित्या उतरतात. अशाप्रकारे सहभागी झालेल्या सोळा सदस्यांची ही मोहीम आयोजकांच्या अथक प्रयत्नांनी यशस्वी होते.

पुढे अंदाजे चार ते पाच किलोमीटरचा तीव्र उतारातला दगड धोंड्याचा खडतर मार्ग दुपारच्या उन्हात पार करत संध्याकाळी पाच वाजता वाल्हीवरे या आदिवासी पाड्यात पोहोचल्यावर सर्वांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. मिलिंद यांच्याबरोबरच केरळमधील तीन गिर्यारोहकांसह पुणे आणि ठाण्याबरोबरच अन्य ठिकाणच्या एकूण सोळा सदस्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. दुर्गभ्रमंतीची आवड असणाऱ्या व याआधी सुध्दा अशा अनेक खडतर आणि तेवढ्याच धाडसी मोहीमा यशस्वीरीत्या पुर्ण करणाऱ्या मिलिंद जाधव यांच्या या थरारक, धाडसी आणि प्रेरणादायी कामगिरीबद्दल त्यांचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### पर्यटकांना प्रचंड आकर्षण

अजस्त्र पसरलेल्या सह्याद्री पर्वत रांगेतील हरिश्चंद्रगडाचा हा विशाल डोंगर ठाणे, पुणे, व अहमदनगर जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेला असून त्याची उंची सुमारे ४,००० फूट इतकी आहे. तसेच महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे शिखर म्हणून प्रसिद्ध असणारे तारामती शिखरसुद्धा याच गडाचा भाग आहे. केवळ एका खांबावर असलेली मोठी केदारेश्वराची गुहा असेल किंवा जुने हेमाडपंथी महादेवाचे मंदिर असेल या सगळ्या या गडाच्या बाबी पर्यटकांना मोहून टाकतात.

RDCC Bank Let's grow together

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

### ग्राहकांसाठी विन्रम आवाहन

बँकेची बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन ही शाखा सध्या श्री.विलास पांडुरंग तोडणकर, मु.पो.बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावर कार्यरत आहे.

परंतु बोर्ली-पंचतन या शाखेकरीता बँकेने 'राजलक्ष्मी बिल्डींग'चे मालक श्री.संग्राम सदानंद खेऊर, माऊली हॉस्पिटलजवळ, मार्केट रोड, मु.पो.बोर्ली-पंचतन, ता.श्रीवर्धन यांच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर जागा भाड्याने घेतली आहे. त्यामुळे बोर्ली-पंचतन शाखेचे बँक कामकाज गुरुवार दिनांक १८-१२-२०२५ पासून नव्या जागेत स्थलांतरीत करण्यांत येत आहे. याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व बँकेस सहकार्य करावे ही विनंती.

सही/-
केंद्र कार्यालय अलिबाग — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
दिनांक :-१६-१२-२०२५

---

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय,**
**मुरुड-जंजिरा यांचेकार्यालय**

दरबार रोड ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड पिन - ४०२४०१
दुरध्वनी / फॅक्स क्र: ०२१४४/२७४०२६
ई मेल-tahasilmurud@gmail.com
क्र. प्रशासन/कात-४/का. दं/जन्म-मृत्यु सुनावणीस उपस्थित/२०२५

दिनांक ०५/१२/२०२५

**नोटीस**

प्रति,
श्री.- राकेश धर्मा भोईर
रा. सावरोली ता. मुरुड-जंजिरा
जि. रायगड

विषय :- जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ मधील सुधारणा २०२३ बाबत.
संदर्भ :- १. भारत सरकार राजपत्र दिनांक ११/०८/२०२३
२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांजकडील क्र. गृह/एमएजी-१/जन्म-मृत्यु नोंदणी कायदा सुधारणा/२०२५ दिनांक २३/०४/२०२५
३. शासन महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २०२५/प्र.क्र.०३/ई-१अ दिनांक १७/०३/२०२५
४. शासन सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. जमृनो २०२५) (ई.ऑ. ९९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दि. १२ मार्च २०२५,
५. मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांजकडील पत्र क्र. नपाप्र/कार्या-४/न.प.सा.नि./निवडणूक निर्णय अधिकारी/२०२५/२४४ दिनांक ०३/११/२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळिवण्यात येते की, आपला या कार्यालयाकडे दिनांक २२/१०/२०२४ रोजी जन्म-मृत्युची नोंद होणेकामी विनंती अर्ज या कार्यालयाकडे अर्ज प्राप्त झाला आहे.

मा. सचिव (१) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडील शासन निर्णय क्रमांक ज. मृ. नोंद २५२५ (ई. ऑ. ९९११८१)/प्र. क्र. २२/कु. क. दिनांक १२ मार्च २०२५ अन्वये, जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.

मध्यंतरी काळात नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक आल्याने जन्म मृत्यु नोंदीबाबतच्या सुनावणीचे कामकाज होऊ शकले नाही. तरी सदरच्या सुनावण्या दिनांक २४/१२/२०२५ रोजी ठेवण्यात आले असुन आपण दिलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित राहवे.

सदरहू सुनावणीस आपण उपस्थित न राहील्यास आपणास याकामी काहीही सांगण्याचे नाही, असे गृहीत धरुन पुढील निर्णय दिला जाईल यांची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**( आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, उल्हासनगर यांचे न्यायालय, गांधी रोड, उल्हासनगर-५**

दुरध्वनी क्र. ०२५१-२५३०५६८ ई-मेल : tahulhasnagar@gmail.com

१. श्री. संतोष धर्मा भगत — अर्जदार
रा. चिंचवाडी, देवपाडा पो. पाशीर
ता.कर्जत,जि. रायगड
विरुद्ध
२. निबंधक तथा निवासी वैद्यकिय अधिकारी, — सामनेवाला
जिल्हा शल्यचिकित्सक, मध्यवर्ती रुग्णालय,
उल्हासनगर-३, जि. ठाणे

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे के येणेप्रमाणे

उपरोक्त अर्जदार संतोष धर्मा भगत यांच्या मुलाचा प्रतीक संतोष भगत यांचा जन्म उल्हासनगर येथे दिनांक १०/०३/२०२३ रोजी झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म नोंद, निबंधक तथा निवासी वैद्यकिय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ दप्तरी करुन जन्म दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

२. उशीरा जन्म नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, उल्हासनगर यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दावा क्र ८३/२०२५ दाखल केला आहे.

३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी, वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांचा जन्म दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली असे.

हुकुमावरुन
सही/-
**(कल्याणी कदम)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, उल्हासनगर**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) उषा अशोक जोहरी २) परशुन अशोक जोहरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ८१ | २८ | ०-१०-०० | ०-०९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/१२/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

---

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे कोलमांडला, ता. मुरूड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. सतिश तुकाराम टेकाळकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे कोलमांडला, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| कोलमांडला ता.मुरुड | २५/२ | ०-२१-५०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकुण क्षेत्र ०-२२-५० | ५.५० |

वर नमुद मिळकतीमधील श्री.सतिश तुकाराम टेकाळकर यांच्या मालकीचे क्षेत्र ०-०७-०० हे. आर. या जमिन मिळकतीबाबतचे

दिनांक : १७/१२/२०२५

अशिलांची सही
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे वांजळोशी, ता. तळा, जि. रायगड येथिल ....**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.महादेव प्रभाकर झेंडे | ३१/३१ | वरकस ००-२१-००<br>पो.ख. ००-२४-००<br>एकुण ००-४५-०० | ०.०८ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. १७/१२/२०२५

सही/-
**ॲड. पी.जी.दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी-विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे डॉस्पिटल जवळ, ता.रोहा, जि.
रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक फैन्सी शांतीलाल जैन यांचेकडून कायम मालकी हक्काने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग, | ३६/१/२/२ | १-८३-०० | १८.३० |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मुत्युपत्र अन्नवस्त्र, जप्ती, लिज, बोजा, जामिनकी, कुळहक्क, कब्जा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु., करार, ताबेकब्जा वहिवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर हितसंबंध अगर तक्रारी/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सदर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही तर, सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छने सोडुन दिला आहे असे समजुन गृहित धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पुर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक: /१२/२०२५
मो.नं: ९०२८८५१२८०

**ॲड. विराज शदर अंबुकर**
मु. हनुमान वाडी, थेरोंडा, पो.चौल,
ता.अलिबाग, जि.रायगड

---

## जाहीर नोटीस

आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरून तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत श्री.प्रकाश नाना पाटील, रा. भायमळा, ता.अलिबाग, जि.रायगड, महाराष्ट्र यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील कायदेशीर मिळकत ज्योती सदानंद धोदरे, रा. वाघ्रण, पो. नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड हया विकत घेत आहेत. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| भायमळा | ८९ | ०-३४-८० | ०.७० |

वरील वर्णनाची मिळकत मौजे भायमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र.८९, क्षेत्र ०-३४-८०, आकार ०.७० पैसे या मिळकतीपैकी मिळकत आमच्या अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी विद्यमान मालकाशी सुरू आहे. तरी यावर नमूद सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजाविरहित असून तिचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे अशी खात्री मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिली आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणत्याही इसमाचा संस्था, साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसहक्क, पोटगीदान, गहाण, तारण, बोजा भाडेपट्टा, अदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर करावी तसेच उक्त मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असून तिचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करणार आहोत व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. हे कळावे.

अलिबाग
ता.१६/१२/२०२५

**ॲड. जान्हवी ऋषिकांत कार्लेकर**
रा.मु.पो. कुरूळ, आगर आळी,
बापदेव नाका, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९६७३७९५९१०/९०६७५१८५५५

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत जमिनीच्या शेजारील जमिनी खरेदी करण्याचे ठरविले असुन त्याच्या चर्तुसिमा तपासणीसाठी खालील सर्व्हे नं. च्या हरकती नोटीसीसाठी दिलेली माहीती काही माहीतीच्या गैरसमजुतीमुळे दि. १२/१२/२०२५ च्या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द झाली.

**मिळकतीचे वर्णन -**
**मौजे - वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे /हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| श्री. नारायण बापु तळपे | ६५/२/अ | ०.३५.०० | ५.४५ |
| श्री. नामदेश तुकाराम लदगे इतर ९ | ६५/४ | ०.१३.९० | २.१९ |
| श्री. दामु रावजी कराळे | ६५/५ | ०.१३.९० | २.१८ |
| श्री. रत्नाकर काशिनाथ तळपे इतर ७ | ६६/२ | ०.२९.१० | ५.४४ |
| श्री. नारायण बापु तळपे | ६६/३ | ०.४५.०० | ५.५६ |
| श्री. एकनाथ नथु लदगे | ६४/५ | ०.१३.०० | ० |
| श्री. दामु रावजी कराळे | ६४/६ | ०.०९.७० | १.३७ |
| श्री. तुकाराम बापु लदगे इतर १ | ६४/७ | ०.०४.६० | ०.७८ |
| श्री. रामचंद्र बापु लदगे | ६४/८ | ०.०४.८० | ०.७८ |
| श्री. एकनाथ हिरु लदगे | ६५/१ | ०.०३.०० | ०.०३ |
| श्री. किसन हिरु लदगे इतर ५ | ५०/१ | ०.३६.९० | ६.८७ |
| श्री. रत्नाकर काशिनाथ तळपे इतर ७ | ५१/१ | ०.९७.५० | १५.६९ |
| श्री. प्रदिप ज्ञानेश्वर तळपे इतर ४ | ५१/२ | ०.५४.०० | ९.२५ |
| श्री. लक्ष्मी हरीचंद्र लदगे इतर ३ | ६४/३ | ०.१९.०० | ३.७५ |
| श्री. रामचंद्र बापु लदगे | ६४/४ | ०.३५.५० | ६.५७ |

पूर्वीच्या नोटीसीद्वारे कोणत्याही पक्षकारास/शेतक-यास किंवा व्यक्तिस गैरसमज झाले असल्यास किंवा मानसिक त्रास झाला असल्यास त्याबद्दल आम्ही क्षमस्व आहोत. पूर्वी प्रसिध्द झालेली नोटीस ही ह्या जाहीर नाम्याद्वारे रद्द समजण्यात यावी. या जाहीरनाम्याव्यतिरिक्त आमच्या आशिलाचा वरील जमिनींवर कोणताही हक्क किंवा बाधा आणण्याचा हेतु नाही.

दि. १५ नोंव्हेंबर २०२५

ॲड. योगेश तानाजी आगज
(बी.ए.एलएल.बी.)
पत्ता : फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी मुद्रे, कर्जत, जि. रायगड - ४१० २०१.
मो.नं. ७२७६८१७८९०

---

## जिल्हाधिकारी रायगड यांचे कार्यालय

### झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक बाबीचा पुरवठा करणे करीता निविदा सूचना

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
सामान्य शाखा
झेरॉक्स निविदा/कावि/२०२५
दि. १६/१२/२०२५

रायगड जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे कामकाजाकरीता, तसेच सदर निवडणुकांच्या पूर्व तयारीकरीता जिल्हाधिकारी कार्यालय रायगड व जिल्हयातील सर्व तालुक्याच्या मुख्यालय ठिकाणी अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती/बाईडींग करणे व इतर अनुषांगिक बाबीचा पुरवठा करणेकामी अनुभवी व योग्य अभिकर्त्याकडून विहीत नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**निविदेच्या कामाचा तपशील :-**

रायगड जिल्ह्यातील होणाऱ्या आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चे काम काजाकरीता, तसेच सदर निवडणूकांच्या पूर्व तयारीकरीता जिल्हा निवडणूक कार्यालय रायगड व जिल्हयातील सर्व तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी अथवा सक्षम प्राधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती/बाईडींग करणे व इतर अनुषांगिक बाबींचा पुरवठा करणेकामी ई-निविदा मागविणेत येत आहे.

**सदर निविदेची कार्यक्रम पत्रिका खालील प्रमाणे राहील :-**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजित रक्कम रुपये | रू.१,००,००,०००/- (रु. एक कोटी मात्र) |
| कोऱ्या ई निविदा फार्मची किंमत रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | रू. १९,०००/- (रु. एकोणीस हजार मात्र) (विना परतावा) |
| बयाणा EMD रक्कम रुपये (ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडावी) | रू.१,९०,०००/- (रु. एक लाख नव्वद हजारमात्र) |
| सुरक्षा अनामत रक्कम रुपये (ई-निविदा मंजूर झालेनंतर राष्ट्रीयकृत बँकेची बँक गॅरंटी) | रु.३,००,०००/- (रु. तीन लाख मात्र) |
| ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि.१७/१२/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. १७/१२/२०२५ सकाळी ११.०० वाजता पासून ते दि.२४/१२/२०२५ सायंकाळी ०४.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि.१८/१२/२०२५ वेळ दु. १२.३० वा. |
| ई-निविदा ऑनलाईन स्वीकृतीचा दिनांक व वेळ | दि. १७/१२/२०२५ वेळ सकाळी ठिक ११.०० वा. ते दि.२४/१२/२०२५ सायं. ४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा लिफाफा क्र. १ (निविदा तांत्रिक लिफाफा) उघडण्याचा दिनांक व वेळ | दि.२६/१२/२०२५ वेळ सायं. ४.०० वा. |
| ई निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |
| निविदा करार कालावधी | एक वर्षापर्यंत |
| ई निविदा संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा. प्र.), जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |

१. ज्या निविदाधारकांचे निविदा अर्ज http://mahatenders.gov.in या संकेस्थळावर निर्धारीत मुदतीत सादर केली जातील. केवळ त्याच निविदाधारकांच्या निविदा विचारात घेण्यात येतील. सदर निविदेची वैधता १२० दिवसांकरीता राहील. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त ६० दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना राहील.
२. प्राप्त झालेल्या निविदा कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे.
३. सदरची निविदा काम प्राप्त करुन देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४. निविदेत भाग घेणाऱ्या निविदाधारकानी डिजिटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर विहीत नाव नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
५. निविदाधारकाने/अधिकृत प्रतिनिधीने निविदा पुर्व बैठकीला Pre- Tender Conference (PTC) पूर्व बैठकीला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक वरील प्रमाणे निर्धारित दिवशी जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, सामान्य शाखा, रायगड येथे राहील.
६. निविदाधारकांनी अथवा त्यांनी नामनिर्देशीत केलेल्या प्रतिनिधीने निविदा उघडण्याचे वेळी जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे उपस्थित रहावे.
७. सदर निविदेच्या अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-
**(किशन ना. जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वंजारवाडी, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १) मुरलीधर सुनील चौधरी<br>२)प्राची मुरलीधर चौधरी | ६/२ | ०-४३-०८ | ०-९१ |
| १) गिरीश मधुकर धांडे<br>२) वैशाली गिरीश धांडे | ६/२ | ०-२१-५४ | ०-४६ |
| १)विजया मनोज चौधरी<br>२) मनोज सुनील चौधरी | ६/२ | ०-२१-५४ | ०-४२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/१२/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे झुगरेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४८/३ | एकूण क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | ०.१९ |

**मौजे कोठींबे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३९/१ | एकूण क्षेत्र ०-१२-०० हे.आर. | ०.१० |

**मौजे बोरगाव, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६५/४ | एकूण क्षेत्र ०-६१-०० हे.आर.या पैकी मनोहर जानु खडेकर याचे खाते क्रमांक ६३८ क्षेत्र ०-२०-०० हे.आर. | ०.१६ |

**मौजे धोत्रे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६०/१४ | एकूण क्षेत्र ०-१०-०० हे.आर. | ०.०९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :- १७/१२/२०२५ — **ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल मे. इमारत एन्टरप्रायझेस तर्फे भागीदार नाहीद फातीमा अशरफ इमाम, हसीना बानो सईदुज्जमा अंन्सारी, झेबा तबस्सुम मोहम्मद चांद यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे विद्यमान मालक अशोक चिंधू राणे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. ममदापूर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १६७ | ५ | ३८०-०० | ३८-०० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
दि. १७/१२/२०२५.

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता- शॉप नं.९, समर्थ
कृपाहौसिंग सोसायटी नेरळ,
महेश टॉकीज जवळ, नेरळ
ता, कर्जत, जि. रायगड
पिनकोड न. ४१०१०१
फोन नं. ७३५०१९४२००

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

---


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# पुण्यात रंगणार ‘बजाज ग्रँड टूर’

## || भारतीय क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक टप्पा || पहिल्यांदाच युसीआय २.२ सायकलिंग शर्यतीचे आयोजन

| पुणे | प्रतिनिधी |

भारतात पहिल्यांदाच युसीआय २.२ दर्जाची बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही कॉन्टिनेंटल टीम्स मेन्स एलिट रोड सायकलिंग शर्यत आयोजित होत आहे. त्यामुळे भारतीय क्रीडा क्षेत्रात हा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. १९ ते २३ जानेवारी दरम्यान पुणे जिल्ह्यात ही स्पर्धा रंगणार असून आंतरराष्ट्रीय सायकलिंग कॅलेंडरची सुरुवात करणार आहे. तसेच, ही स्पर्धा चार टप्प्यांच्या बहुदिवसीय आव्हानातून ग्लोबल स्तरावरील प्रेक्षकांना आकर्षित करणार आहे. या स्पर्धेत जगभरातील २८ स्पर्धक संघांचा सहभाग अपेक्षित आहे.

त्यामध्ये चार राष्ट्रीय संघांचा समावेश असून, भारताकडून ‘इंडिया अ’ आणि ‘इंडिया ब’ असे दोन राष्ट्रीय संघ उतरणार आहेत.

पुणे जिल्हा प्रशासनाने ‘कॉन्टिनेंटल टीम्स मेन्स एलिट रोड सायकलिंग शर्यत’ ही ऐतिहासिक क्रीडा संकल्पित केली असून महाराष्ट्र सरकारने ठाम पाठिंबा दिला आहे. ही शर्यत ४३७ किमीच्या मार्गावरून पुण्याच्या नागरी परिसरातून, वारसा-संपन्न स्थळांतून आणि रमणीय ग्रामीण प्रदेशातून प्रवास करणार आहे. बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ मध्ये चार रोमांचक टप्पे असणार आहेत. त्यात जगातील अनुभवी सायकलपटूंच्या क्षमतेची कसोटी पाहता येणार आहे. या शर्यतीतील ४३७ किमी अंतर पार करताना शहरातील गतीमान वातावरण, सह्याद्रीच्या पायथ्याची शांतता, कठीण चढ, वेगवान सपाट रस्ते आणि ऐतिहासिक स्थळांतून जात स्पर्धकांच्या सहनशक्ती, रणनीती आणि कौशल्याला ताण देणार आहे. या उपक्रमातून जागतिक दर्जाचे सायकलिंग सादर करण्याबरोबरच प्रदेशातील पर्यटन, पर्यावरण आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देण्याचा उद्देश आहे.

### उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आनंदः जितेंद्र डुडी

पुणे जिल्हाधिकारी आणि पुणे ग्रँड टूरचे प्रभारी अधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले की, पुणे ग्रँड टूरच्या पहिल्या वर्षाला जगभरातून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आम्हाला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो. युनायटेड किंगडम, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चीन, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड अशा प्रमुख सायकलिंग राष्ट्रांनी उत्सुकता दाखवली असून अनेकांनी सहभागही निश्चित केला आहे. युनियन सायक्लिस्ते इंटरनॅशनल भारतात सायकलिंग क्रीडेला प्रोत्साहन देण्यास अत्यंत उत्सुक आहे. पुण्याला आंतरराष्ट्रीय सायकलिंग गंतव्य म्हणून उभे राहण्याची ही मोठी संधी आहे आणि आम्ही विश्वस्तरीय आयोजन करण्यास कटिबद्ध आहोत, असेही त्यांनी सांगितले.

### चार टप्प्यांतील खडतर मार्ग

**१. मुळशी-मावळ माइल्स (९१.८ किमी)**: पुण्याच्या आयटी हब हिंजवडीमधून जाणारा हा आरंभीचा टप्पा सपाट स्प्रिंट्स आणि शहरी वळणांचा संगम असून आधुनिकता आणि निसर्गाचा सुरेख मिलाफ दाखवतो.

**२. मराठा हेरिटेज सर्किट (१०९.१५ किमी)**: पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला तलावाच्या दृष्टीसह अवघड घाट चढणारा हा टप्पा क्लाइंबिंग आणि सहनशक्तीची खरी परीक्षा आहे.

**३. वेस्टर्न घाट्स गेटवे (१३७.०७ किमी)**: पुरंदरपासून बारामतीपर्यंतचा डेक्कन पठारावरील मार्ग वेग, रणनीती आणि क्रॉसविंड्समुळे अत्यंत स्पर्धात्मक ठरतो.

**४. पुणे प्राईड लूप (९९.१५ किमी)**: अंतिम टप्पा पुणे शहराच्या आधुनिक आणि ऐतिहासिक स्थळांतून शानीवार वाड्यासह जातो आणि शहराच्या मध्यभागात नाट्यमय फिनिशसह संपतो.

# कला-क्रीडा महोत्सवाला प्रारंभ



| रोहा | प्रतिनिधी |

रोहा अंजुमन इस्लाम जंजिरा उर्दू हायस्कुल, रोहा एज्यूकेशनल अँड वेल्फअर असोसिएशन इंग्लिश मिडीयम स्कुल आणि रेवा ज्यूनियर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक कला-क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन रेवा संस्थेचे अध्यक्ष रियाज शेटे व अल खैरीया कमिटीचे अध्यक्ष शफी पानसरे यांच्या हस्ते क्रीडा मशाल प्रज्वलन करुन करण्यात आले.

यावेळी रेवा संस्थेचे उपाध्यक्ष सलीम चोगले, सहसचिव अ.करिम खतीब, अंजुम हायस्कुल चेअरमन अ.कादीर रोगे, अल खैरिया संस्थेचे सचिव मुबीन करजिकर, अरिफ अधिकारी, उस्मान रोहेकर, तजम्मुल डबीर, राहील नागोठकर, अजीज महाडकर आदि मान्यवर उपस्थित होते. ही स्पर्धा रेवा आणि रोहा अंजुमन हायस्कुलच्या भव्य पटांगणावर सलग २० दिवस सुरू राहणार आहे. या स्पर्धेत कबड्डी, गोळाफेक, फुटबॉल, डॉजबॉल, लंगडी, विज्ञान प्रदर्शन, फूड फेस्टिवल, फन फेअर इत्यादी उपक्रम पार पडणार आहेत.

# शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन

| उरण | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटनेच्या मान्यतने द्रोणागिरी स्पोर्ट्स असो. आयोजित द्रोणागिरी श्री, द्रोणागिरी फिजिक व द्रोणागिरी उदय या शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा गुरुवारी (दि.२५) सायंकाळी ४ वाजता उरणमधील बोकडवीरा येथील भव्य पटांगणात पार पडणार आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त शरीर सौष्ठवपटुंनी या स्पर्धेत भाग घेऊन स्पर्धा यशस्वी करावी, अशी विनंती रायगड जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटनेतर्फे व द्रोणागिरी स्पोर्ट्स असो.तर्फे करण्यात आली आहे. या स्पर्धेतून विजयी झालेल्या स्पर्धकांची निवड उरण येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी होणार आहे. अधिक माहितीसाठी जितेंद्र गुरव व संतोष साखरे यांना संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन



| महाड | प्रतिनिधी |

लोकविकास सामाजिक संस्थेच्या एम.एम. जगताप महाविद्यालय महाड येथे दरवर्षी प्रमाणे सांस्कृतिक विभागाच्यावतीने सांस्कृतिक दिवस व विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. नुकतेच या समारंभाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंजय धनावडे यांनी आपल्याप्रस्तावनेतसांस्कृतिकदिन, विविध स्पर्धा, क्रिडा कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक दिनाचे व विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करत शुभेच्छा दिल्या. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे, संस्थेचे विश्वस्त व माजी नगराध्यक्ष संदिप जाधव यांनी सांस्कृतिक दिन, क्रीडा प्रकार हे सामाजिक जडनघणीशी जोडलेले असतात, असे सांगून स्वर्गीय आबांच्या आठवणींना उजाळा दिला. भूपेश पाटील व रोहीत पोरे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन नियोजित कार्यक्रमांसाठी शुभेच्या दिल्या. तसेच, कनिष्ठ कॉलेजच्या प्राचार्या गीतांजली पाटील यांनी अभ्यास, क्रिडा व संस्कृती यांचे अनोखे बंधन त्यांच्या मनोगतातून व्याक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे विश्वस्त संजय चिखले यांनी सांस्कृतिक दिन व क्रीडा स्पर्धा म्हणजे संघटिक उपक्रम असून विद्यार्थ्यांच्या कलात्मक, ऐतिहासिक व सामाजिक पैलूंचा उत्सव साजरा करणे आहे, हे करताना मुलांनी सामाजिक नियमांचे व चौकटिंचे पालन करावे, असे आवाहन केले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख गायत्री करमरकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडून सांस्कृतिक दिन, विविध क्रीडा प्रकार यातून एक सांस्कृतिक जडणघडण आणि वारसा जतन होतो, असे विचार व्यक्त सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

या सांस्कृतीक आणि क्रीडा स्पर्धा सोहळ्याला महाविद्यालयाचे विश्वस्त व पदाधीकारी संजय चिखले, संदिप जाधव, भूपेश पाटील, रोहीत पोरे, प्राचार्य डॉ. अंजय धनावडै, प्राचार्य गीतोजली पाटील, सर्व प्राध्यपक, प्राध्यापकेतर वर्ग व विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# शफाली वर्माची अफलातून कामगिरी

## पटकावला सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूचा मान

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

शफाली वर्माने महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अफलातून कामगिरी करत ८७ धावा केल्या आणि दोन बळी देखील घेतले. तिच्या या कामगिरीमुळे तिला नोव्हेंबर महिन्यातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू पुरस्कार मिळाला. शफालीने या पुरस्काराला संघ, प्रशिक्षक आणि कुटुंबाला समर्पित केले आहे.



आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून प्रत्येक महिन्यातील सर्वोत्तम महिला आणि पुरुष क्रिकेटपटूला पुरस्कार देण्यात येते. त्यानुसार आता नोव्हेंबर महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूंच्या पुरस्काराची घोषणा आयसीसीकडून करण्यात आली. या महिन्यात भारताच्या शफली वर्माने या पुरस्कारावर नाव कोरले आहे. भारताची युवा फलंदाज शफाली वर्माने नोव्हेंबरमध्ये महिला एकदिवसीय विश्वचषक २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना खेळला होता. या सामन्यातील तिच्या अफलातून कामगिरीसाठी तिला हा नोव्हेंबर २०२५ महिन्यातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू पुरस्कार मिळाला आहे. विशेष म्हणजे २१ वर्षीय शफली वर्मा या जागतिक स्पर्धेसाठी भारतीय संघाचा भागही नव्हती, परंतु, सेमीफायनलपूर्वी प्रतिका रावलला दुखापत झाल्याने तिच्या जागेवर शफालीला संधी देण्यात आली होती. तिने या संधीचे सोने करताना अंतिम सामन्यात ८७ चेंडूत ८७ धावांची खेळी केली. तिने आक्रमक खेळताना स्मृती मानधनासोबत सलामीला १०० धावांची भागीदारी केली. त्यामुळे भारताला ७ बाद २९८ धावांपर्यंत मजल मारता आली होती.इतकेच नाही, तर शफालीने फलंदाजीनंतर गोलंदाजीतही योगदान दिले. तिने दक्षिण आफ्रिकेच्या सून ल्युस आणि मारिझान काप या प्रमुख फलंदाजांना बाद केले. तिने ७ षटकांत ३६ धावा खर्च करत २ बळी घेतले. तिच्या या कामगिरीमुळे तिला अंतिम सामन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कारही मिळाला होता.

# वयाच्या बहात्तरीत तीन सुवर्णपदके

**निरगुडसर :** एखाद्या तरुणाला लाजवेल अशी कामगिरी वयाच्या बहात्तरीत सुधा खडकीफाटा येथील हरिश्‍चंद्र रामभाऊ थोरात यांनी केली आहे. वयाच्या बहात्तरीत सुद्धा सुवर्णपदके मिळण्याचा सपाटा सुरू असून भोसरी येथे झालेल्या राज्यस्तरीय मास्टर गेम्स स्पर्धेत चालणे आणि धावणे यामध्ये थोरात यांनी तीन सुवर्णपदक पटकावले आहेत. तसेच, पुढील महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी हरिश्‍चंद्र थोरात यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. या स्पर्धा पुण्यातील भोसरी-इंद्रिरानगर येथील श्री संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात दि.१३ आणि १४ डिसेंबर रोजी पार पडलया. या स्पर्धेत पाच हजार मीटर धावणे मध्ये सुवर्णपदक, दीड हजार मीटर धावणेमध्ये सुवर्णपदक आणि पाच हजार मीटर चालणे मध्ये सुवर्णपदक अशी एकूण एकाच स्पर्धेत तीन सुवर्ण पदके पटकावली आहेत.

# अटीतटीच्या सामन्यात साताऱ्याचा विजय



| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

महाराष्ट्र क्रिकेट असो. च्यावतीने एकोणीस वर्षाखालील मुलांच्या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धा रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर खेळवली जात आहे. गव्हाण येथील छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील मैदानावर बीड जिल्हा क्रिकेट असो. विरुद्ध सातारा जिल्हा क्रिकेट असो. या संघांमध्ये रंगला होता. या अटीतटीच्या सामन्यात साताऱ्याने विजय मिळवला.

सातारा संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाज करताना पहिल्या डावात सर्वबाद २०१ धावा केल्या. त्यानंतर बीड संघाने पहिल्या डावात सर्वबाद २२१ धावा केल्या. मात्र, पहिल्या डावात बीड संघाने २० धावांची आघाडी घेऊन देखील दुसऱ्या डावात साताऱ्याच्या भेदक गोलंदाजी समोर अवघ्या २४ धावांनी सामना गमवावा लागला. सातारा संघाने दुसऱ्या डावात सर्वबाद १०६ धावा केल्या होत्या. बीड संघाला सामना जिंकण्यासाठी ८७ धावांची गरज असताना अवघ्या ६२ धावसंखेवर डाव आटोपला. या सामन्यासाठी प्रमख अतिथी म्ह अमित कडू, सुजित ठाकूर, सुदेश ठाकूर, रोशन ठाकूर व आरडीसीए उपाध्यक्ष राजेश पाटील आदी उपस्थित होते. तर, सामनाधिकारी म्हणून चंद्रकांत म्हात्रे, ॲड. पंकज पंडित व सनी म्हात्रे यांनी काम पाहिले.

## राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग | एक कोटी रुपयांचे बक्षीस

# सिडको ओपन गोल्फ कोर्स स्पर्धा

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

**नवी मुंबईतील खारघर येथे १ कोटी रुपये बक्षीस असलेली गोल्फ कोर्स स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग असणार आहे. त्यामुळे या स्पर्धेला वलय निर्माण झाले आहे. सिडको आणि द प्राफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया यांच्या संयुक्तपणे लार्सन अँड टुब्रोद्वारे सादर केलेल्या पहिल्या सिडको ओपन गोल्फ कोर्स स्पर्धा खारघरमधील गोल्फ कोर्स व्हॅलीमध्ये १६ ते १९ डिसेंबरदरम्यान रंगणार आहे. तसेच, या स्पर्धेत १ कोटी रुपयांचे बक्षीस असल्याचे सिडकोचे व्यस्थापकीय संचालक अशोक सिंघल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**



खारघर येथील सिडकोच्या गोल्फ कोर्स व्हॅलीमध्ये प्रथमच गोल्फ कोर्स स्पर्धा रंगणार असून स्पर्धेत १२६ व्यावसायिक खेळाडू सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा स्ट्रोक-प्ले स्वरूपात खेळवली जाणार आहे. प्रत्येकी १८ होलच्या चार फेऱ्या असणार आहेत. दोन फेऱ्यांनंतर त्यातून ५० अव्वल खेळाडू निवडले जाणार आहेत. या स्पर्धेत युवराज संधू, अर्जुन प्रसाद, मनू गंडास, अंगद चीमा, खलिन जोशी आणि ओम प्रकाश चौहान हे आघाडीचे खेळाडू असणार आहेत. विशेष म्हणजे, या खेळात नवी मुंबईतील मनोज कुमार, मयूर ठाकूर आणि पंकज ठाकूर आणि मुंबईचा अनिल बजरंग माने याचाही समावेश आहे.

### विदेशी खेळाडूही लढणार


गोल्फ कोर्स स्पर्धेत श्रीलंकेचे एन. थंगाराजा आणि के. प्रबागरन, बांगलादेशचे जमाल हुसेन, मोहम्मद सिद्दीकुर रहमान, बादल हुसेन, नेपाळचे सुभाष तमांग या विदेश खेळाडूंचा समावेश असणार आहेत. तसेच, मुर्बी गावातील पंकज ठाकूर हे खारघरमधील गोल्फ कोर्समध्ये बॉलपिकर कामगार म्हणून काम करीत होते. आता ते गोल्फ प्रशिक्षक म्हणून काम करीत आहेत. विशेष म्हणजे, त्यांनी मुंबई, हैदराबाद, बंगळूरमध्ये या खेळाची चुणूक दाखवली आहे.

### १८ होल मैदानावर स्पर्धा

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल म्हणाले की, सिडको ओपन २०२५ ही आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धा आयोजित करताना आनंद होत आहे. ही एक आंतरराष्ट्रीय गोल्फ स्पर्धा आहे. उदयोन्मुख खेळाडूला प्रोत्साहन देणारी आहे. तसेच, सिडकोने तयार केलेल्या आंतरराष्ट्रीय गोल्फ मैदानातील १८ होल मैदानावर स्पर्धा रंगणार आहे. ही स्पर्धा जागतिक दर्जाची असून नवीन गोल्फ खेळाडूसाठी हे जागतिक उद्याच्या जागतिक व्यासपीठ प्रदान करणारी आहे. गोल्फ कोर्स स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रमास माजी क्रिकेटपटू कपिल देव उपस्थित राहणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सचिन तेंडुलकर यांनाही निमंत्रित करण्यात आले असल्याचे विजय सिंघल यांनी सांगितले.

## निवडक

### आकाश पाटीलची राज्यस्तरीय निवड



**खांब :** बीड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पुरुष गट खो-खो अजिंक्यपद स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघात एस.एन. एस. स्पोर्ट्स रोहा पुरस्कृत ओम साई राम (सानेगाव) संघाचा खेळाडू आकाश पाटील याची निवड झाली आहे. आकाशने जिल्हा निवड चाचणी स्पर्धेत उत्तम कामगिरी करत हे यश मिळविले आहे. त्याच्या या यशामध्ये त्याचे प्रशिक्षक व संघातील इतर खेळाडू यांचा सिंहाचा वाटा आहे. एस.एन.एस. स्पोर्ट्सचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तर, आकाशच्या या निवडीबद्दल सानेगाव गावासह संपूर्ण रोहा तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पोलीस मुख्यालयाची सुवर्ण कामगिरी



**पनवेल :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ ते ११ डिसेंबर दरम्यान राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा सिंधुदुर्ग येथे यशस्वीरीत्या पार पडल्या. या स्पर्धेत महाराष्ट्रभरातून सुमारे ४०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. मुंबई विभागातून १० पुरुष व १० महिला खेळाडू सहभागी झाले होते. यामध्ये पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाचे ६ कुस्तीगीर सहभागी झाले होते. या कुस्तीगीरांनी उत्कृष्ट तंत्र, जिद्द व मेहनतीच्या जोरावर ३ सुवर्णपदके व ३ कांस्यपदके पटकावत संकुलाचे वर्चस्व सिद्ध केले. विशेष म्हणजे ३ सुवर्णपदक विजेत्या कुस्तीगीरांची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत सोहम ढगे (३८ किलो) वेदांत येळकर (६८ किलो) आणि स्वप्निल लावंड (७५ किलो) याने सुवर्णपदक पटकावले. तर, यश घुगे (६२ किलो) हृषिराज पाटील (५२ किलो) आणि संशिखा शर्मा (३३ किलो) यांनी कांस्यपदक पटकावले आहे. अशाप्रकारे एकूण ६ पदके मिळवत पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाने राज्यस्तरावर आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक व संकुल व्यवस्थापनाचे सर्वत्र कौतुक होत असून राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.



### फुटबॉलमध्ये जेएसएम महाविद्यालयाचे यश

**अलिबाग :** जेएसएम महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या कोकण विभाग क्रमांक ४च्या फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा जिमखाना समिती प्रमुख डॉ. रवींद्र चिखले व इतर समिती सदस्यांनी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील व प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. या स्पर्धेत यजमान जेएसएम महाविद्यालयाने जेतेपद पटकावले असून त्यांच्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने मुंबई विद्यापीठामार्फत दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. याचाच एक भाग म्हणून जेएसएम महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या कोकण विभाग क्रमांक ४च्या फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या फुटबॉल स्पर्धेत कोकण विभागातील एकूण ४ संघ सहभागी झाले होते. या फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील व उपप्राचार्य डॉ. प्रविण गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी या फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद जेएसएम महाविद्यालयाने पटकावले असून गोगटे जोगळेकर महाविद्यालयाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या वेळी मुंबई विद्यापीठाच्या निवड समितीचे प्रमुख समीर गाडगीळ तसेच प्रथमेश पाटील, रितेश ठाकूर, श्रेयश पाटील, साहिल कांबळे हे मॅच रेफ्री म्हणून उपस्थित होते. स्पर्धेचा बक्षीस समारंभ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.

### लिओनल मेस्सीला भारतीय क्रिकेट संघाची जर्सी भेट




**महाड :** अर्जेंटिनाचा विश्वविजेता फुटबॉलपटू लिओनल मेस्सी सध्या भारत दौऱ्यावर असून वेगवेगळ्या शहरांना भेट देत आहे. त्याचा सोमवारचा भारत दौऱ्यातील अखेरचा दिवस होता. कोलकाता, हैदराबाद, मुंबईनंतर सोमवारी मेस्सी लुईस सुवारेज आणि रोड्रिगो डी पॉल या फुटबॉलपटूंसह दिल्लीत पोहोचला होता. त्यांच्या भारत दौऱ्यातील हा शेवटचा टप्पा होता. हा दौरा मेस्सी इंडिया टूर २०२५ अंतर्गत आयोजित होता. साधारण दुपारी सव्वाचारच्या सुमारास मेस्सी, सुवारेझ आणि डी पॉल दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये पोहचले होते. त्यांनी मैदानाच्या काही फेऱ्या मारून चाहत्यांचे प्रेम स्वीकारल्यानंतर मैदानात या तिघांचाही सन्मान करण्यात आला. दिल्लीतील सोहळ्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष जय शाह आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ताही हजर होत्या. यावेळी जय शाह मेस्सीला भेटले. त्यांनी मेस्सीसह सुवारेझ आणि डी पॉल यांचा भारतीय क्रिकेट संघाची जर्सी देऊन सन्मान केला. या जर्सीवर या तिघांचीही नावे आणि त्यांचे जर्सी क्रमांक लिहिलेले होते. याशिवाय स्वाक्षरी केलेली एक क्रिकेट बॅटही जय शाह यांनी मेस्सीला भेट दिली. याशिवाय या तिन्ही खेळाडूंना पुढच्या वर्षी भारत आणि श्रीलंकेत आयोजित करण्यात आलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेतील भारताच्या पहिल्या सामन्यासाठी आमंत्रण दिले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)